
बृहन्मुंबई महानगरपालिका
सिताराम मिल कम्पाऊंड
उच्च. प्राथ. म. शाळा
मुंबई -

# गिरण्यांतील भाकित न केलेल्या खुनांची बखर

डॅरेल डी मोंटे

मला वाटते की कामगारांच्या हक्कासाठी लढणारा मीच एकमेव मूर्ख कामगार नेता आहे व मला हेही ठाऊक आहे मी असा नायक म्हणून मरणार आहे ज्याचेबद्दल कुणीही दु:ख करणार नाही.

कामगार संघटनेचे नेते दत्ता सामंत त्यांचे खुनापूर्वी दोन दिवस नव्वदच्या सुरुवातीपासून शहरी जीवनाची जुनी प्रस्थापित व्यवस्था नवीन ताज्या अनिश्चिततेला जागा करून देत होती. औद्योगिक क्षेत्रातील नोकऱ्या कमी होणे ही कठोर वस्तुस्थिती होती. घरांच्या किंमती छप्पर फाडून आकाशाला भिडल्या होत्या व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा भेसूर चेहरा वर दिसू लागला होता या प्राणघातक रसायनाचे हे तिन्ही घटक जेव्हा उकलू लागले, तेव्हा कुप्रसिद्ध खटाव प्रकरणातील गिरणीच्या जमिनीचे विक्रीसंबंधी हालचाल सुरू झाली. या कथेत मॉलिवुड (बॉलीवुडच्या धर्तीवर मिलसंबंधी मॉलिवुड) सुप्रसिद्ध चित्रपटाचा सर्व मालमसाला ठासून भरलेला आहे. उदा. गोळीबार, टोळीयुद्ध, संघटनांची गळचेपी वगैरे वगैरे. खटाव हे मुंबईतील गिरणीमालक कुटुंबापैकी सर्वात जुने - कुटुंब 1994 मध्ये त्यांच्या मिलला 125 वर्षे झाली होती, याचा अर्थ असा की शहरातील पहिल्या गिरणीच्या स्थापनेनंतर डझनभर वर्षात ही गिरणी स्थापन झाली. त्याचे क्षेत्र 13 एकरावर पसरले असून ही जमीन अत्यंत किंमती आहे. भायखळा हे मध्यवर्ती व्यापारी केंद्राला जवळ असल्यामुळे परेल लालबागपेक्षा त्याची बाजारातील किंमत अधिक आहे.

नव्वदीच्या सुरुवातीस मिलमध्ये 5700 कामगार होते व मिलला एकूण संचित तोटा 54 कोटी रुपयांचा होता. मिलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. सुनील खटाव हे होते. त्यांचे वय 55 वर्षांचे होते. त्यांची इच्छा या गिरणीचे स्थलांतर अधिक मोठ्या जागेत (जरा कमी किंमतीच्या) करावे अशी इच्छा होती. त्यांनी बोरीवलीत40 एकराचा एक प्लॉट संपादित केला होता. त्यावर हे स्थलांतर व्हायचे होते. दुसरा पर्याय म्हणजे हे स्थलांतर मुबंईबाहेर थेट महाड येथे करायचे जिथे 1985 मध्ये मिलने विव्हींग युनिट स्थापन केलेले होते. 1991-92 मधल्या उदार आर्थिक धोरणांच्या प्रारंभाची या घाणेरड्या नाट्याला पार्श्वभूमी लाभली होती हे लक्षात घ्यायला हवे. खटाव

माकनजी स्पिनिंग अँड विव्हींग कंपनी बीआयएफआरकडे गेली. खटाव कुटुंबाच्या या वंशजांची मिल चांगल्या तऱ्हेने चालवण्याबद्दल चांगली प्रतिमा नव्हती, त्यामुळे तो अधिकारावर असेपर्यंत आर्थिक संस्था त्याला मदत करण्यास तयार नव्हत्या. सुरुवातीस मिलची सूत्रे दुसऱ्याकडे सोपवण्यास त्याने नकार दिला पण जेव्हा आर्थिक संस्था ऐकेनात व त्यांची मदत पंधरावडाभर रोखून धरली तेव्हा खटावनी पायऊतार होण्यास संमती दिली.!

पुनर्वसनाच्या प्रस्तावाचा एक भाग म्हणजे भायखळ्याची जमीन विकणे हा होता. जर त्या योजनेला मान्यताप्राप्त संघटना, राष्ट्रीय मिल मजदूर संघ यांची संमती असेल तर बीआयएफआर व महाराष्ट्र सरकार या योजनेस मान्यता देणार होते. 50000 चौ.मी. जमिनीची खरी किंमत काय यावर प्रथम मतभेद होता. खटाव यांच्या मते तिची किंमत 80 कोटी रुपये होती. तर सरकार व आर्थिक संस्थाचा अंदाज 250 कोटीच्या जवळपास होता व हा अंदाज जवळपासच्या जमिनीच्या किंमतीवरून बांधला गेला होता. त्या जमिनीवरील हक्कदाराची निश्चिती नसल्यामुळे आणखी घोटाळा निर्माण झाला होता. शिवाय रा.मि.म. संघाचे अध्यक्ष श्री. हरिभाऊ नाईक यांचा ही विक्री होऊ देण्यास विरोध होता, जोपर्यंत ज्या कामगारांची नोकरी जाईल व पुनर्वसनाचा व्यवस्थित प्रस्ताव पुढे येत नाही. तोपर्यंत हा विरोध असणार हा त्यांना संशय होता की खटाव आपली मौल्यवान मालमत्ता स्वत:च्या व्यक्तिगत फायद्यासाठी विकत आहेत. कामगारांनी पण विरोध केला कारण त्याना इतरत्र तरी पुनश्च नोकरी मिळेल की नाही याची खात्री नव्हती. जरी खटाव म्हणाले की कोणालाही कामावरून काढले जाणार नाही. तरी त्यांचे म्हणणे हे बऱ्याचशा सावधपणेच घेतले गेले. सर्व गिरण्या अतिरिक्त अधिक कामगारासहित चालवल्या जात होत्या, तेव्हा खटाव यांना देखील त्यांच्याकडील 1/3 स्टाफ कमी करून उत्पादनात बाधा न आणणे शक्य होते.

खटावनी आपली योजना पुढे रेटण्यासाठी रा. मि. म. संघाच्या निवडणुकीत हरिभाऊ नाईक यांच्या परभावासही हालचाल केली. नाईकांच्या जागी गुन्हेगारी टोळीप्रमुख अरुण गवळी यांच्या मदतीने शंकरराव जाधव आले. त्यांचे पुतणे सचिन व विजय अहीर आधीच खटाव यांचे व्यक्तिगत सहाय्यक व अंगरक्षक म्हणून काम करत होते. या कराराप्रमाणे ते जाधवांना रा. मि. म. संघाचे अध्यक्ष होण्यास मदत करणार होते व त्याच्या बदल्यात त्यांना कामगारांचे बोरीवलीस जाण्याबद्दल मन वळवायचे होते. जाधव यांना गवळी टोळीचा पाठिंबा होता. ते (गवळी) त्यांना शस्त्रात्रे, दारुगोळा व लक्षावधी रुपये पुरवणार होते. नाईक व तिडके हे इंटकचे (इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस) राज्यस्तरीय अध्यक्ष होते. इंटकही अखिल भारतीय काँग्रेस पुरस्कृत संघटना होती. यांनी (नाईक-तिडके) मुख्यमंत्री शरद पवार यांना प्रत्यक्ष भेटून इथे काम चालले आहे याची कल्पना दिली व आता जर काही उपाय योजना केली गेली नाही तर ती ट्रेड युनियन चळवळीशी तडजोड ठरेल असा इशारा दिला.

तथापि मुख्यमंत्र्यांचे पुतणे श्री. अजित पवार व मुख्यमंत्र्यांचे जवळचे सहकारी श्री. गोविंदराव आदिक यांची नावे. गवळी पुरस्कृत रा. मि. म. संघाच्या निवडणूक पॅनेलमध्ये होती, याचाच अर्थ या गटाशी हातमिळवणी केली असा होत असल्याने, हे उघड होताच विधान सभेत खूप गदारोळ माजला. विरोधकांनी यावर विधानसभेत गोंधळ माजवल्यावर काँग्रेसने माघार घेतली. काँग्रेस व विरोधी पक्षांनी गुन्हेगारी टोळीचे सहाय्य घेतल्याबद्दल खटाव यांच्या अटकेची मागणी केली. वृत्तपत्रे व इतर राजकारण्यांनी रा.मि.म. संघ ताब्यात घेण्याबद्दल खूप चर्चेचा गदारोळ उडवून दिला व या अत्यंत कौशल्याने घडवून आणलेल्या निवडणुकीबद्दल एका सार्वजनिक हितयाचिका (पीआयएल) दाखल करण्यात आली. यावेळी हरिभाऊ नाईक हे जीनिव्हा येथे इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या बैठकीस हजर राहण्यास गेले होते. या सगळ्यांतून काही निष्पन्न झाले नाही व असे दिसते की काँग्रेसने देशातील सर्वात मोठ्या कापड

कामगार संघटनेच्या निर्लज्जपणे बळकावून घेण्याच्या घटनेकडे काणाडोळा केला. या युनियनच्या 1 लाख कामगारांची संघटना घातकी गुन्हेगारांकडून बळकावली गेली. लाचखाऊ व धूर्त रा.मि.म. संघात जाधव सुखांत आसनस्थ झाले होते. रा.मि.म. संघ हे काँग्रेस सरकारचे युद्धोत्तर अपत्य असून कुप्रसिद्ध बॉम्बे इंडस्ट्रियल रिलेशन्स ॲक्टने (बीआयआर) त्याचे पालन पोषण केले आहे. बीआयआरप्रमाणे सर्व कापड गिरणी कामगारांची एकच युनियन असू शकते. खटाव यांनी भायखळा येथील जमिनीच्या विक्रीबद्दल गुप्तकरार केला. अनेक सूत्रांकडून असा आरोप केला जातो की गवळीला 5 कोटीचे आश्वासन दिले गेले आहे किंवा विक्री किंमतीच्या 5 टक्के. त्या जमिनीची किंमत 250 ते 400 कोटीपर्यंत येईल असा अंदाज होता, मुंबईतील घर-जागांच्या किंमतीचा सर्वोच्च फायद्याचा तो काळ होता, त्याच्या आधारे ही किंमत होती. दोघे आहिर (सचिन सध्या आरएमएमएसचा सचिव असून गोविंदराव आदिक हे अध्यक्ष आहेत.) गिरण्यामध्ये अंदाधुंद शिरून कामगारांना गिरणी बोरिवलीत हलवण्याच्या योजनेस संमती देण्याच्या पत्रकावर सक्तीने सह्या करण्यास भाग पाडत होते.

हे संमतिपत्रक हातात आल्यावर खटाव राज्य सरकारकडे गेले व त्यांनी जमीन विक्रीची परवानगी मागितली. मिळालेल्या माहितीनुसार त्याने एका कन्स्ट्रक्शन कंपनीशी जवळजवळ करार केला होता. ही कंपनी दाऊद इब्राहीम या दुबईस्थित अत्यंत खतरनाक अशा मुंबईतील डॉनच्या टोळीचा दर्शनी भाग होता. डॉ. दत्ता सामंत यांनी अगदी उघडपणे हा आरोप केला व 400 कोटीचा व्यवहार ठरल्याचे सांगितले. ते म्हणाले, राजकारणी व गिरणीमालक युनियनमध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीस शिरकाव करू देण्यास जबाबदार आहेत. ''अशा तऱ्हेच्या व्यवहाराला बहुसंख्य गिरणीकामगारांची संमती मिळवण्यासाठी त्यांनी कामगारांना धमकावण्यास गुन्हेगारी टोळ्या आणल्या.'' असा सामंतांनी आरोप केला, खटावचे उदाहरण देऊन ''आपली लोकशाहीची आयुधे या तऱ्हेच्या धमकावण्याशी सामना करण्यास अपूरी ठरत आहेत. मी त्यांच्याविरुद्ध आवाज उठवत आहे. मी मोर्चे काढले, कार्यक्रम आयोजित केले. त्याचा या टोळ्यावर थोडासा वचक निर्माण झाला आहे.''

कुप्रसिद्ध डी कंपनीचा दाऊद इब्राहीम 80 सालच्या सुरुवातीस दुबईला पळून गेल्यानंतर आणि त्याच्या टोळीतील, उरलेली मंडळी मार्च, 1993च्या ओळीने झालेल्या बॉम्ब हल्ल्यानंतर टिपली गेल्यानंतर अमरनाईक व अरुण गवळी यांच्या प्रतिस्पर्धी टोळ्या दाऊदची रिकामी जागा घेण्यासाठी आल्या. दोन्ही टोळ्यांपैकी जरा मऊ-गवळी याने राजकारणात येण्याची योजना आखली. अरुण गवळीच्या कुप्रसिद्ध दगडीचाळ - दक्षिण मध्य मुंबईतील त्याची गुहा - या गुहेत लपलेली त्याच्या टोळीतील एकजण म्हणाला, ''दाऊदला नाव घेण्यासारखा प्रतिस्पर्धी फक्त भाईच आहे. तेव्हा साहजिकच दाऊदचे लोक त्याच्या मागावर आहेत. इथल्या पोलिसांना पण त्याला मेलेला पाहायचे आहे. आज ना उद्या तो पोलिसांशी होणाऱ्या चमकमकीत मारला जाणार. तेव्हा त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे राजकारण होय.'' मुंबईचे भूतपूर्व पोलीस कमिशनर अरमजितसिंह सामरा यांच्या मते अरुण गवळीच्या टोळीमध्ये 800 जीवावर उदार असे लोक आहेत व त्यांना दरमहा रु.4000 पर्यंत मानधन मिळते. गुन्हेगारी टोळ्यांच्या प्रमुखपदाचा मुकुट मिळवण्यासाठी घनघोर चकमकी झडतात आणि असे दिसते की अंतिम लढत ही अरुण गवळी व अमर नाईक यांच्यात होईल, कारण दाऊद हा आता दृष्टीच्या पल्याड मनाच्या पल्याड जात आहे, जरी त्याची इथे कोट्यावधी रुपयांची मालमत्ता आहे. तरीसुद्धा दहा वर्षाच्या काळात हा पोलीस हेड कॉन्स्टेबलचा साधा दिसणारा मुलगा, प्रत्येक गुन्ह्यामध्ये हजेरी लावत होता.

मे 7, 1994 रोजी सुनील खटाव, त्यांच्या सफेद मर्सिडीज मधून जात असताना त्यांची गाडी महालक्ष्मी रेसकोर्सजवळच्या सिग्नलला थांबली. त्याचवेळी मोटार

सायकलवरून आलेल्या दोघा टोळी गुन्हेगारांनी थांबून त्यांच्या गाडीची काच हातोड्याने फोडली व त्यांच्या शरीरात 11 गोळ्या झाडून ते पसार झाले. त्यांच्या ड्रायव्हरने त्यांना जवळच्या नायर हॉस्पिटलमध्ये नेले पण तिथे पोहचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. एका महत्त्वाच्या उद्योजकाचा भर दिवसा झालेला तो पहिला खून होता. त्यामुळे सर्व शहरात धक्क्याची लाट पसरली. या व्यापारी नगरातील जमिनीच्या व्यवहारातील गुन्हेगारी टोळ्यांच्या भूमिकेवर मोठ्या नाट्यपूर्ण रीतीने लोकांचे लक्ष वेधले गेले. एका कल्पनेनुसार खटाव यांचे गवळींशी फार जवळचे संबंध होते. व त्यांचा खून गवळींचे प्रतिस्पर्धी अमर नाईक टोळीने केला. टोळी युद्धातून होणाऱ्या खूनामधून पोलीस व वृत्तपत्रे खूप दूरचे - अर्धवट पुरावे असलेले अंदाज वर्तवत असतात. जर भायखळा जमीन व्यवहार पूर्णत्वास गेला असता तर नाईकना भीती वाटली की गवळी शहरातल्या सर्व एके-47 खरेदी करू शकेल व प्रतिस्पर्धाला खलास करून टाकेल. असेही बोलले जाते की अमरचा भाऊ अश्विन नाईक याच्यावर 18 एप्रिल रोजी मुंबईतील सेशन्स कोर्टात झालेल्या प्राणघातक हल्ल्याचा तो प्रतिशोध होता. अश्विन नाईकच्या डोक्यात अगदी जवळून सरळ गोळी मारली गेली होती ज्यामुळे तो अर्धांगवायु सदृश्य अपंग झाला.

अमर नाईक ऑगस्ट 1996 मध्ये पोलिस चकमकीत मारला गेला. गोळी लागल्यानंतर अश्विन नाईक सहा महिने जे जे हॉस्पिटलमध्ये होता. तेथून सुटल्यावर तो पुनः भूमिगत झाला. पोलिसांच्या माहितीप्रमाणे तो प्रथम दक्षिण आफ्रिकेत गेला. त्याच्या हालचालीच्या क्षेत्रात अहमदाबाद, काठमांडू, लंडन व टोरोंटो ही शहरे येतात. 1999 मध्ये बांगलादेशात प्रवेश करताना त्याना पं. बंगालच्या पोलिसांनी पकडले होते. त्यावेळी मुंबई पोलिसांना तो खून, मारामारी, खंडणी वसूल करणे इत्यादी 15 ओरापाखाली हवा होता. खटाव यांच्या खूनासाठीही तो हवा होता. दक्षिण आफ्रिकेत मँड्रॅक्स (अमली पदार्थ) विकण्यात तो गुंतला होता. या व्यापारामध्ये त्याला प्रचंड नफा मिळाला. त्यातून त्याच्या टोळीसाठी अत्याधुनिक शस्त्रास्त्रे विकत घेता आली. दोन्ही टोळ्यांचे जुने वैर सुरुच राहिले. गवळी येरवडा मध्यवर्ती तुरुंगातून सूत्रे हलवी व नाईक भायखळ्याच्या आर्थर रोड तुरुंगातून आपली सूत्र हलवी. तिथूनच अमली पदार्थ विकणाऱ्या गुन्हेगारी जगताशी त्यांचे संबंध प्रस्थापित झाले. वृत्तपत्र लेखकांच्या कल्पना शक्तीला पंख फुटले जेव्हा 1999च्या सर्वसाधारण निवडणुकीचे वेळी नाईकची हजेरी लागली. तो दक्षिणमध्य व उत्तरमध्य मतदार संघातील मतदारावर प्रभाव टाकू शकत होता, त्याचप्रमाणे या विभागातील विधानमंडळ मतदार संघावर सुद्धा. पुण्याबाहेरच्या त्याच्या गावी गवळी गेल्यामुळे नाईक विद्यमान शिवसेना खासदार मोहन रावले यांचेसाठी तरुणांचा पाठिंबा मिळवू शकत होता. रावले यांनी गेली निवडणूक अगदीच थोड्या मताधिक्याने (100 मते) जिंकली होती. खटाव यांच्या खुनापूर्वी फक्त तीन आठवडे, हत्यारधारी टोळींनी केलेल्या प्राणघातक हल्ल्यातून जाधव बचावले होते. ते त्यांच्या गाडीने कार्यालयात येत असताना हत्यारधारी मोटार सायकलवरून आले व त्याच्या दिशेने गोळ्या झाडल्या. पोलिसांचा विश्वास आहे की त्याची आरएमएमएसवर निवड झाल्यामुळे अमर नाईक टोळीने जाधवांना लक्ष्य केले असावे. मारेकरी कोण असावेत. याबद्दल आपल्याला काही माहिती नसल्याचा त्यांनी बहाना केला व त्याचे कुठल्याही गुन्हेगारी टोळीशी अथवा गुंडाशी संबंध असल्याचा त्यांनी इन्कार केला. हे घडावे अशी इच्छा असणाऱ्या काही लोकांचे हे विचार आहेत.'' ते म्हणाले. ''ते युनियनमध्ये येऊ शकत नाहीत म्हणून युनियन्स या गुंडाच्या आहेत असा डांगोरा पिटत आहेत. मी इंजिनिअर आहे व गेली 30 वर्षे युनियनचा सभासद आहे. माझी चांगली प्रतिमा व प्रतिष्ठा आहे. अगदी अलिकडे मला हे कळले आहे की गवळीचे काही दूरचे नातेवाईक हे आरएमएमएसचे सभासद आहेत. मला ते फक्त कामगार म्हणून माहीत आहेत. सचिन हा पदवीधर आहे व उत्तम इंग्लीश बोलतो.

व तो खटाव मिलमध्ये काम करतो. बस इतकेच आमच्या सभासदापैकी कोणीही गुन्हेगारी टोळ्यांशी संबंधित नाही. जाधव यांच्यावर संघटना सोडण्यासाठी शरद पवार यांच्याकडून दबाव आहे असे बोलले जाते, कारण त्यांचे असे वेडेवाकड्या मंडळींशी असलेले संबंध.

पवार यांची खटाव यांच्या खुनावरची प्रतिक्रिया म्हणजे हीच की, त्यांनी आणखी कोणत्याही मिलच्या जमिनींची विक्री ताबडतोब थांबवली. कारण या व्यवहारात गुन्हेगारी टोळ्यांचा प्रवेश झाला होता. राज्य सरकारची, कापड गिरणी उद्योग बीआयआरच्या कक्षेतून काढून टाकण्याची योजना होती. पण हे राजकारणी अरण्यरुदन होते. आपल्या खिशात असलेली संघटना व त्यावरील नियंत्रण सुखासुखी सोडण्याची काँग्रेसची तयारी नव्हती. गोविंदराव आदिक अद्यापही तिचे अध्यक्ष आहेत व सचिन आहिर तिचे कार्यवाह म्हणून काम करत आहेत. (1998 मध्ये गिरणी मालक संघाच्या ताजमहल हॉटेलमध्ये झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी सचिन आहिर हे चकाचक थ्री पीस सूटमध्ये आले होते. खरे तर जमलेल्या गिरणी मालकांच्या गर्दीत तेच जास्त संपन्न व समृद्ध दिसत होते. आरएमएमएस प्रकारच्या युनियन प्रतिनिधीबद्दल तूर्तास एवढेच पूरे.....)

खटाव यांच्या खूनानंतर उद्योजक असे म्हणत असल्याचे ऐकिवात आहे ''खूनामुळे मिलजवळील अधिक जमिनीची विक्री प्रक्रिया थोडी हळू होईल. नाहीतर गुन्हेगारी जगत त्यातल्या काही भागावर हक्क सांगू लागेल.'' 500 एकरावर असलेल्या गिरण्याकडील अतिरिक्त फक्त जमिनीची किंमत एका मासिकाने रु. 8275 कोटी इतकी सांगितली आहे. या जमिनीचा अपार्टमेंट्स ऑफिस संकुल वगैरे प्रकारे विकास केल्यास त्यांची किंमत 15270 कोटी एवढी इतकी आहे.

दत्ता सामंत यांनी 1982-83चा गिरणीकामगारांच्या खूप लांबलेल्या व कष्टप्रद संपाचे नेतृत्व केले. ते स्वत: मिल जमिनीच्या पुनर्विकासास परवानगी देण्याच्या धोरणाचे अत्यंत कडवे टीकाकार होते. ''गिरणीच्या व इतर कारखान्यांच्या जमिनींची विक्री मुख्यमंत्र्यांच्या धोरणानुसार होते आहे'' असा त्यांनी आरोप केला. अनेक आजारी उद्योग गेल्या दोन वर्षात बंद पडले यांचे कारण म्हणजे राजकारणी, बिल्डर्स, मालक व युनियन्स यांची अशुभ युती. त्यांना कामगारांना हकलून लावून पैसे कमवायचे आहेत. बहुतांश गिरण्या आजारी नाहीत, त्यांना आजारी पाडण्यात आले आहे.'' 1991 इतक्या मागे त्यांनी इशारा दिला होता.'' सरकार उद्योगकांच्या हातचे खेळणे म्हणून वावरत आहे. शरद पवार यांनी गिरणी मालकांना त्यांच्या जमिनी विकून त्यावर पंचतारांकित हॉटेल्स बांधायला संपूर्ण अधिकार दिले व त्यामुळे आणीबाणी निर्माण होण्यास मदत झाली. सरकार हा यातील मुख्य अपराधी आहे. ते कामगारांची फसवणूक करत आहे. त्याच्या कामगार विरोधी धोरणामुळे 2 लक्ष कामगार बेकार झाले आहेत. दररोज अधिकाधिक उद्योग बंद पडत आहेत. ''स्वत:च्या अलंकारिक भाषेत वहावत जात ते म्हणाले की याला दोन उपाय आहेत.'' एक म्हणजे याला राजकीय उपाय शोधणे - मंडळ आयोग किंवा रामजन्मभूमी सारखा, किंवा नक्षलाईट चळवळ सुरू करणे.'' त्याचवर्षी निवडणुकीच्या भाषणात शिवसेना व काँग्रेस हे गिरणीच्या जमिनींची विक्री थांबवण्याचे श्रेय स्वत:कडे घेऊ लागले. तेव्हा सामंत यांनी हे श्रेय घेणे मूर्खपणाचे आहे म्हणून त्याचा निषेध केला. ''अशा तऱ्हेच्या केवळ तोंडी सहानुभूतीचा काही उपयोग नाही.'' ते कडाडले. काँग्रेस (आय) व शिवसेना यांचे स्पष्ट संगनमत झाले आहे व दोघे मिळून गरीब गिरणी कामगारांना संपवून टाकतील''.

खटाव मकनजी मिलमध्ये आपल्या ताकदीचा उपयोग केला जातो हा आरोप यावेळी काही प्रथमच केला गेला नव्हता. दत्ता सामंताच्या युनियनच्या सभासदांनी टेक्सटाईल संपाचे वेळी गवळी टोळीचे लोक कामगारांना धमकवण्यासाठी कसे वापरण्यात येत होते याची उदाहरणे दिली. सामंत म्हणतात

जेव्हा संप संपण्याची चिन्हे दिसेनात तेव्हा आरएमएमएसचे मुख्य कार्यवाहक भाई भोसले यांनी संपकाळात अरुण गवळीसह सर्व गुन्हेगारी टोळ्यांच्या प्रमुखांना आर्थर रोड तुरुंगातून सोडवले. आता पुन: या टोळीचा उपयोग सरकारला जमिन विक्रीच्याबाबत मदत करण्यासाठी केला जातो आहे. कारण सरकार उघडपणे हे करू शकत नाही. सामंतांसाठी लोकसभेच्या 1989च्या निवडणूकीसाठी प्रचार करू नये म्हणून कामगारांना धमकवण्यात आले. सामंत दक्षिणमध्य मुंबई मतदार संघातून निवडणूक लढवत होते. यावेळी ते पराभूत झाले. (तीन वेळा ते निवडणूक हरले. पण 1984 मध्ये ते निवडून आले, त्यांचा संप अयशस्वी झाला त्यानंतर लगेचच)

कोणत्याही दृष्टीने विचार करता खटाव प्रकरण हा मुंबईच्या औद्योगिक नातेसंबंधातील एक घाणेरडा व दु:खद अध्याय आहे. या प्रकारच्या गलिच्छ वाऱ्यांची चाहूल आधी लागली होती. 1989 मध्ये पोलिसांनी रिलायन्स उद्योग समूहाचे सार्वजनिक संपर्क विभागाचे प्रमुख कीर्ती अंबानी यांना अटक केली. रिलायन्स - जोमाने वाढणाऱ्या कृत्रिम कापडाच्या साम्राज्याचे अधिपती धीरूभाई अंबानी यांनी त्यांच्या कट्टर शत्रू नसली वाडिया - सुस्थापित व अत्याधुनिक बॉम्बे डाइंगचे मालक यांच्या खुनाची सुपारी अर्जुन बाबरिया या गुन्हेगारी टोळीवाल्याला दिली. म्हणून कीर्ति अंबानींना अटक झाली. गुन्हेगारी टोळ्यांचे राजकारण गिरणीच्या क्षेत्रात झिरपल्याचा धडधडीत पुरावा (ज्याच्यापुढे अन्य कोणत्याही पुराव्याची आवश्यकता नाही) मी जेव्हा एका खटाव मिलच्या कामगाराला विचारले तेव्हा मला मिळाला, तो म्हणतो सुनीत खटाव यांच्या अत्यंसंस्काराचे वेळी कोणत्याही वरिष्ठ व्यवस्थापकाने भाषण केले नाही पण फक्त सचिन अहिरने स्वत: भाषण केले. खटाव यांचे स्वप्न पूरे करण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली व गिरणीचे बोरीवलीला स्थलांतर करू असे सांगितले. त्या कामगाराने पुढे सांगितले की तिथे गवळीशी निष्ठा बाळगणारे अंदाजे 500 कामगार होते. गिरणीतला प्रत्येक कामगार भयभीत होता व आपला आवाज उठवू शकत नव्हता. कारण त्यांना त्यांच्या कुटुंबाची काळजी होती. खटाव यांच्या पुनर्विकास योजनेत 650 कामगारांना कमी करण्याचे आरएमएमएसने मान्य केले होते.

सुनीत खटाव यांच्या खुनानंतर तीन दिवसांनी टाइम्स ऑफ इंडियाने 'सूडाची हत्या' (रिप्रिसल किलिंग) या नावाने संपादकीय लिहिले. त्याचा काही भाग असा :-

एका दृष्टीने खटाव यांचा खून हे मुंबईच्या दोन गुन्हेगारी टोळीयुद्धाचा परिणाम म्हणता येईल. आणखी खोल गेल्यास ही घटना शहरासाठी सुयोग्य जमीन वापर धोरणाच्या उणीवेवर प्रकाश टाकते. शहरातील जागांचे भाव जुनाट कायद्यांमुळे भरमसाट वाटून काल्पनिक उंचीवर पोचले आहेत. गिरणीच्या जमीन विक्रीचा वादग्रस्त मुद्दा अशा तऱ्हेच्या धोरणाच्या अभावाशी निगडित आहे. खटाव मिलच्या बाबतीत, जी मध्य मुंबईतील अत्यंत महत्त्वाच्या 13 एकर जागेत वसली आहे ती इतरत्र स्थलांतरित करण्यासाठी कामगारांची परवानगी घेणे आवश्यक ठरते. (बोर्ड ऑफ इंडस्ट्रीयल अँड फायनांशियल रिकन्स्ट्रशन बीआयएफआर यांचे नियमानुसार) सध्याच्या आर्थिक उदारीकरणाच्या दिवसांत जेव्हा आजारी कापड गिरण्यांचे आधुनिकीकरण व उन्नतीकरण आवश्यक आहे. अशा वेळी ज्या गिरणीमालकाला यासाठी पैसे (भांडवल) उभे करायचे असतील तर त्याने कामगारांना पुरेशी नुकसान भरपाई दिली पाहिजे. सुनीत खटाव यांचा दु:खद मृत्यू हेच सिद्ध करतो की असे साध्य गाठण्यासाठी संशयास्पद लोकांवर अवलंबून राहणे यांची अंतिमत: फार मोठी किंमत मोजावी लागते. खटावची कहाणी इथेच संपत नाही. त्यांची विधवा पत्नी पन्ना खटाव यांनी कदाचित त्यांच्या गुन्हेगारी जगताशी असलेल्या संबंधापासून लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी तिच्या नवऱ्याचा खून त्यांच्याच काही नातेवाईकांच्या सांगण्यावरून झाला असावा असा आरोप केला. त्यांचे पश्चात तिने मिलचा ताबा घेतला. नोव्हेंबर

1994 मध्येच बीआयएफआरचे त्यांच्या पुनर्वसन प्रस्तावाला मान्यता दिली होती. व जानेवारी 1995 मध्ये काँग्रेस राज्याच्या काँग्रेस सरकारने त्याला संमती दिली होती. 10 लाख चौ. फूट जमीन विकण्यासाठी दोन वर्षानंतर गिरणी बेकायदेशीररित्या बंद केल्याबद्दल जोराचा वाद निर्माण झाला. खटाव यांची जमीन विक्री मंजूर केली नाही तर कायदेशीर कारवाई करण्याची धमकी बीआयएफआरने राज्य सरकारला दिली. शिवसेनेचे मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी अतिरिक्त जमिनीच्या विक्रीस मान्यता दिली परंतु हे स्पष्ट केले की ही परवानगी अपवादात्मक म्हणून देण्यात येत आहे. कारण कामगारांनी स्वत: तशी मागणी केली आहे. कारण स्टेट बँकेने मिलला कर्जाची रक्कम देण्यास नकार दिला आहे. ही रक्कम कामगारांचे पगारासाठी असून बोरीवलीच्या जमिनीची विल्हेवाट मंजूर होत नाही तोवर ही रक्कम देता येणार नाही. फक्त आरएमएमएस जी अल्पमतातील कामगारांचे प्रतिनिधीत्व करते. तिने या व्यवहारास संमती दर्शविली. या व्यवहारात गिरणीमालक, युनियन व नंतरचे मुख्यमंत्री यांचे, राजकीय निष्ठा बाजूस ठेऊन केलेले उघड वा छुपे संगनमत यावरून स्पष्ट होते. या विक्रीस फक्त या अटीवर परवानगी दिली होती की ही जमीन औद्योगिक कामासाठीच वापरली जाईल जेणे करून शहरातील रोजगार निश्चित होईल.

तिने एका श्रीमंत हिरे व्यापाऱ्याशी करार केला. बी. विजय कुमार अँड कं. चे श्री. भरत शाह यांचेबरोबर 1995 मध्ये बोरिवलीयेथील 40 एकर जमीन विक्रीचा तो करार होता. शहानी त्यासाठी 80 कोटी रुपयांची बोली दिली, त्यांची कंपनी रिशिना कंन्स्ट्रक्शन कंपनीच्यावतीने. त्यांनी10 कोटीचा आगाऊ हप्ता दिला जो स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये ठेवला. बीआयएफआरच्या पुुर्नविकास प्रस्तावाचे स्टेट बँक ऑफ इंडिया हे मुख्य बँकर होते. प्रमोटर्स, बँक्स व अन्य आर्थिक संस्थांनी प्रत्येकी 15 कोटी उभे करायचे होते जेणेकरून खटावची खेळत्या भांडवलाची गरज भागू शकेल. तथापि 1997 मध्ये शहानी या व्यवहारातून अंग काढून घ्यायचे ठरवले. कारण जमिनीच्या किंमती बऱ्याच उतरल्या होत्या व जुन्या अटी त्यांना आता फायदेशीर वाटत नव्हत्या. त्या अटी आता मूर्खपणाच्या होत्या. शहानी तक्रार केली. मी ही मालमत्ता माझ्या नावावर करू शकत नाही. 25% जमीन मला सरकारला परत करणे भाग आहे. सरकारला विचारल्याशिवाय मी जमीन विकू शकत नाही. अशा अटीवर कोण आपला पैसा गुंतवणार?''

शहांनी अंग काढून घेतल्यामुळे पन्ना अडचणीच्या परिस्थितीत सापडली होती. तिने कळवले की अधिक कर्जमुक्त होण्यासाठी ती पुन:आर्थिक संस्थांशी बोलणी करत आहे व पुनर्विकास प्रस्तावाला पुन: काम करण्याची तिला आशा वाटत होती. जर आयसीआयसीआयने तिचे कर्ज माफ केले तर ती नवीन 102 कोटींचा पुनर्वसन प्रस्ताव तयार करील व तो बीआयएफआरकडे पाठवील. फेब्रुवारी 1997 मध्ये तिने कामगारांना पगार देणे थांबवले. पैशाच्या कमतरतेमुळे गिरणीतील कामकाज थंडावले. पैशाची कमतरता डेव्हलपरकडून यायचे पैसे लांबल्यामुळे सुरू झाली. त्यांनाही अर्बन लँड सीलिंग ॲक्टकडून परवानगी मिळण्यास उशीर झाल्यामुळे त्यांचेकडून पैसे मिळण्यास उशीर झाला. ती म्हणाली. कन्सिडरेशन अमाऊंट डेव्हलपरकडून मिळताच जेव्हा मला कंपनीच्या व्यवस्थापनाचे निमंत्रण मिळेल, तेव्हा मी उरलेली 13 कोटीची रक्कम घालण्यास तयार आहे.''

जेव्हा गिरणी कामगार संघर्ष समितीने (जीकेएसएस - स्वतंत्र व बांधिलकी मानव कापड उद्योग युनियन) कामगारांचा प्रश्न हातात घेतला व हायकोर्टात दावा दाखल केला, तेव्हा कोर्टाने गिरणीला कामगारांचा फेब्रुवारीचा पगार त्यावर्षी सप्टेंबरमध्ये द्यायला सांगितले. 43 लाख रुपये जे पगाराच्या थकबाकी पोटी द्यावयाचे त्याचा स्टेट बँकेचा हिस्सा40 टक्के, आयसीआयसीआय बँकेचा20 टक्के, इंडस्ट्रीयल डेव्हलरमेंट बँक (आयडीबीआय)चा 20 टक्के व उरलेला 20 टक्के हिस्सा श्रीमती खटाव यांनी स्वत: द्यावा.

बिल्डरने आपली जबाबदारी पूरी करावी कारण सर्व योजना त्यावर अवलंबून आहे असे तिचे मत होते. वेळ हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्यामुळे आपण सर्वांनी - म्हणजेच बीआयएफआर, कामगार, सरकार - सर्वांनी मिळून कंपनीला बिल्डरकडून कायदेशीर पणे येणे असलेली रक्कम वसूल करावी. गिरणी नोव्हेंबरपर्यंत सुरू होणे मला निश्चितच आवडेल. आणि हो गिरणीची विक्री होणार नाही.'' तिने आश्वासन दिले. आर्थिक संस्थांकडून अपेक्षित असलेला पाठिंबा या ठिकाणी महत्त्वाचा होता. त्या जुने कर्ज माफ करण्यास तयार होत्या किंवा नवीन क्रेडीट देण्यास तयार होत्या याचे एकमेव कारण गिरणीच्या पगारपत्रकावर असलेल्या कामगारांना संरक्षण मिळावे हे होय. म्हणून मिलच्या ताब्यात असलेली जमीन ही खासगी मालमत्ता समजता येणार नाही. तसेच त्याची मनाप्रमाणे विल्हेवाटही लावता येणार नाही. गिरण्या या सार्वजनिक पैशावर चालत आहेत व म्हणून कामगारांचे हित पाहणे ही त्यांची सामजिक तसेच नैतिक जबाबदारी आहे.

कामगारांच्या आमरण उपोषणामुळे व न्यायालयाचा अवमान केल्याचा आरोप यामुळे पत्राने एक महिन्याच्या पगाराची थकबाकी देऊन टाकली. गिरणी कामगार संघर्ष समितीला जाणवले की त्यांनी काही कृती केली नाही तर कामगार वाऱ्यावर सोडले जातील. त्यानी 21 कोटीची स्वत:ची सुधारणा योजना पुढे आणावी. त्यांनी कामगारांची सहकारी संस्था म्हणून गिरणी चालवावी असे सूचवले. सर्व नोकरवर्ग संस्थेचे सभासद होतील स्वत:च्या प्रा. फंडातले 5000 रुपये भरून यांची वर्गणी 3 कोटी रुपये होईल व तितकीच वर्गणी राज्य सरकार देईल. गिरणी चालवण्यासाठी व्यावसायिक व्यवस्थापनाची आवश्यकता होती. मुंबईच्या प्रसिद्ध कमानी इंजिनिअरिंगच्या बाबतीत आजारी औद्योगिक युनिट कामगारांनी चालवायला घेतले होते त्याचा अनुभव ताजा होता. संचालक मंडळामध्ये कामगारांचे प्रतिनिधी, व्यवस्थापक, कापड उद्योगातले व्यावसायिक तज्ज्ञ (राज्य सरकारने सूचविलेले) आर्थिक संस्थांचे प्रतिनिधी व बीआयएफआर यांचा समावेश असेल. त्यांना व्यावसायिक व्यवस्थापकीय संचालक व उत्पादन व विक्री यासाठी वरीष्ठ कार्यकारी अधिकारी यांचीपण आवश्यकता भासेल.

मीना मेनन या जीकेएसएसच्या कमिटीच्या सभासद होत्या. त्यांनी हे स्पष्ट केले की समितीचा जमीन विक्रीस तसा विरोध नाही. पण या विक्रीवर तात्पुरती बंदी घालावी असे म्हणते त्याचे एवढेच कारण की अशा विक्रीबाबत एक धोरणात्मक निर्णय घेतला जावा.'' अशा तऱ्हेच्या कोठल्याही प्रस्तावात त्यामुळे निर्माण होणारे उत्पन्न व त्यामुळे शहराचा कसा फायदा होणार आहे याचा विचार व्हायला हवा. अशा विक्रीसाठी एक सर्वंकष योजना हवी ती म्हणजे तथापि सचिन आहिर यांनी कामगारांची सहकारी संस्था ही कल्पना फारशी यशस्वी होण्याजोगी नाही असे म्हणून ती फेटाळून लावली. आयसीआयसीआयने दुसरा एक 175 कोटींचा सुधारणा प्रस्ताव आणला. यानुसार भायखळा येथील गिरणीचे आधुनिकीकरण करावे. महाराष्ट्र सरकारने आयसीआयसीआयला सांगितले की त्यांचा खटाव व्यवस्थापनावर विश्वास नव्हता व मालकांची गिरणी चालवण्याची इच्छा आहे की नाही याबद्दल त्यांना गंभीर साशंकता होती. बीआयएफआरने ही स्वत:हून व्यवस्थापनाच्या नव्या योजनेस हरकत घेतली व राज्याचे मजूरमंत्री शब्बीर शेख हे यांच्या खूप तोंडदेखले बोलण्यातूनसुद्धा काही निष्पन्न झाले नाही. पन्न खटाव यांच्या दोन योजना व कामगारांची योजना यापैकी काहीच झाले नाही.

ऑगस्ट 1999 मध्ये बीआयएफआरने पन्ना खटाव यांच्या सहकार्याने मिल पुन: उघडावी व चालू करावी यास हिरवा झेंडा दाखवला होता असे आरएमएमएसकडून सांगण्यात येते. 30 महिन्यांच्या पगारापैकी 1/3 पगार कामगारांना मिळणार होता तसेच तीन वर्षाचा बोनसही. स्वेच्छा निवृत्ती योजनेखाली कामगारांची संख्या 1500 नी कमी करण्याचा पण एक प्रस्ताव होता. या योजनेसाठी 102 कोटी रुपये लागणार होते. त्यातील 1/3 रक्कम खटावनी घालायची होती व 37 कोटी रुपये

बोरीवलीतील अतिरिक्त जमीन विक्रीतून मिळणार. दोन कन्स्ट्रक्शन कंपन्या कृष्णा व फतेह नवनिर्माण यांना जमीन विकत घेण्यात रस होता. जीकेएसएसने या योजनेस विरोध केला. त्यांचा आरोप होता की आरएमएमएसने कामगारांचा 1/3 पगार 6 महिने आधीच देण्याच्या करारावर सही केली होती. व त्याच्यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही. यावरून हे सिद्ध होते की मालकांना फक्त जमीन विकण्यात रस आहे, गिरणी पुन: सुरू करण्यात नाही. शिवाय आरोप केला, कारण त्यांनी आपला प्रतिनिधी पण बीआयएफआरच्या मिटिंगला पाठवला नव्हता

## दु:स्थितीतील गिरण्या व कारखान्यांच्या जागांवर टोळ्यांचा डोळा

जानेवारी 1997 मध्ये दत्ता सामंत यांची त्यांच्या घराच्या बाहेर भाडोत्री मारेकऱ्यांच्या गोळ्यांनी पाशवी हत्या झाली. त्याचे पडसाद संपूर्ण ट्रेड युनियन चळवळीत उमटले. मारेकऱ्यांबद्दल अनेक अंदाज वर्तवले गेले. खुनापूर्वी सामंत प्रिमियर ऑटोमोबाईल्समधील प्रदीर्घ परंतु अखेरीस अयशस्वी लॉकआऊटसंबंधी चर्चेत गुंतले होते. प्रिमियर ऑटोमोबाईल्स व प्यूजोट कंपनीच्या सहकार्याने कुर्ला व डोंबिवली येथे कारखाने चालवित होते. अनुभवी कामगार पुढारी व भूतपूर्व डॉक्टर (आरोग्यसेवा) यांनी आता इंजिनिअरिंग उद्योगात पाय रोपले होते. त्यांचा दगडखाणीत काम करणाऱ्या कामगारांशी पेशंट म्हणून संबंध आला व त्यांच्या झगड्यांत ते ओढले गेले. त्याच्या कारकीर्दीच्या अत्युच्य क्षणी त्यांना सर्वात जास्त कामगारांचा पाठींबा होता, एका व्यक्तीने चालवलेल्या युनियनचा नेता म्हणून. जगातील अन्य युनियनिस्टपेक्षा जास्त कामगार त्यांच्या पाठीशी होते. इतर युनियन्स या राजकीय पक्षांशी व इतर ग्रुपशी संलग्न असत. त्यांच्या कामगार आघाडीत एकत्र मिळून 300 औद्योगिक युनिट्समध्ये 2.5 लाख कामगार होते.

त्यांनी 1982-83 मधील कापड गिरणी कामगारांचा संप खूप लांबण्याचे त्यांचे धोरण हे चुकीचे होते. त्याचप्रमाणे या उद्योगाला गुढघे टेकायला लावण्यास ते एकटे जबाबदार आहेत असा आरोप केला जातो. असे जरी असले करी आपण आधीच्या भागात पाहिले त्याप्रमाणे ते या उद्योगातील भांडणात भाग घेण्यास सुरुवातीपासूनच नाखूष होते, कारण या उद्योगाशी त्यांची जवळीक नव्हती. दोन गोष्टी हे निर्णायक रीतीने सिद्ध करतात की उद्योजक, सरकार व उच्चभ्रू यांना सामंताच्या लढाऊ डावपेचासंबंधी काहीही वाटे, कामगार वर्ग त्यांच्याबद्दल अतीव आदर बाळगतो. 18 महिने चाललेला गिरणी कामगारांचा संप संपल्यानंतर (अधिकृतरित्या तो कधीच संपला असे जाहीर झाले नव्हते.) ते लोकसभेवर निवडून आले - बिगर काँग्रेस पाच उमेदवारांमधून. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशावेळी जेव्हा वृत्तपत्रे व माध्यमे समग्र ट्रेड युनियनचा मृत्यूलेख लिहिण्यात गुंग होते, त्यावेळी ते निवडून आले. 1996 मध्ये बिझिनेस इंडिया या इंग्रजी मासिकाच्या मुखपृष्ठ कथेचे शीर्षक होते. ट्रेड युनियन लूझिंग क्लाऊट (कामगार संघटना प्रभावहीन होत आहेत.) तडतोड न करणारा नेता व अशा तऱ्हेच्या राजकारणाशी संबंधित भ्रमनिरासाच्या विरुद्ध लढणारा अखेरचा बुरुज म्हणून कामगारांना त्यांच्याबद्दल अतिशय आदर होता. ज्या हजारोंच्या संख्येने उत्स्फूर्तपणे कामगार त्यांच्या अखेरच्या यात्रेत सामील झाले त्यावरून हे सिद्ध होते. त्यांची प्रेतयात्रा परेल-लालबागमधून काढण्यात आली.

त्यांच्या खुनानंतर लिहिलेल्या वेगवेगळ्या संपादकी लेखनांतून डोकावले प्रस्थापितांच्या संशयात्मकतेची बऱ्यापैकी कल्पना येऊ शकते. इंडियन एक्स्प्रेसने लिहिले'' कामगार विरोधी नेता दत्ता सामंतांचा मुंबईवरचा प्रभाव अपायकारक.''

ज्यानी कोणी 70च्या अखेरीस व 80व्या सुरुवातीस त्यांचा प्रभाव वाढल्याने पाहिले असेल, ज्यावेळी त्यांचे मुठीत अनेक कामगारा संघटना होत्या त्यावरून त्यांच्या प्रारंभातच त्यांचा अंत होता असे त्यांना जाणवल्यावाचून राहिले नसते. अखेरीस मुंबईच्या औद्योगिक आस्थापनांचा कर्दनकाळ व कामगार वर्गाची महान आकांक्षा असलेला मनुष्य हा मुंबईतील कामगार संघटनेचे भवितव्य, सीलबंद करणारा म्हणून

ओळखला जाईल. संघटना जितका जास्त जोर लावील तितका जास्त फायदा होईल. कामगारांच्या प्रश्नासाठी भांडणाऱ्या त्यांच्या कारकीर्दीचा उच्चतम बिंदू तो होता, जेव्हा 1982 मध्ये चुकीच्या कल्पनेने, वाईट तऱ्हेने आयोजित केलेल्या कापड गिरणी कामगारांच्या संपाने शहरातील सर्वात जुना व मोठा कामगार वर्ग शहरातून पुसून टाकला गेला.8 महिने चाललेल्या संपाने सामंतानी ते करून दाखवले जे कोणत्याही सरकारी किंवा व्यवस्थापन वर्गास करणे शक्य नव्हते. संपामुळे आजारी उद्योगाच्या आधुनिकीकरणाचा मार्ग मोकळा झाला. पण त्याची माणसांच्या बाबतीत द्यावी लागलेली किंमत खूप मोठी, असंयुक्तिक होती. या अनर्थानंतरही कामगार आघाडी संघटना वाढत आहे हा एक कटू चमत्कार आहे.

**टाईम्सना अग्रलेख साधारण त्याच आशयाचे शीर्षक**

''वादळी अखेर''

1970 व 1980च्या सुरुवातीस शहरातील कामगार जगतात समिती एक पंथ तयार झाला होता. याचे मुख्य कारण म्हणजे ते मुख्य औद्योगिक युनिट्सच्या व्यवस्थापनाकडून भरपूर सवलती मिळवत असत. मुंबईच्या अर्थव्यवस्थेची जोरदार वाढ होत होती. त्याचा फायदा ते घेत होते. बऱ्याचवेळा ते या सवलती, हिंसेचा शस्त्र म्हणून अविचारी वापर करून व्यवस्थापनास शरण येण्यास भाग पाडून मिळवत. हीच युक्ती त्यांनी प्रतिस्पर्धी संघटनांच्या विरुद्ध पण वापरली. या संघटनेत त्यांच्या स्वत:हून मोठ्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव होता. त्यामुळे ती संघटना त्यांच्यावर पूर्णपणे अवलंबून होती. मुंबईत दुर्दैवाने कामगार संघटनेच्या ऱ्हासामुळे तयार झालेली पोकळी ही पद्धतशीरपणे गुन्हेगारी टोळ्यांच्या शिरकावामुळे भरली जात आहे. डॉ. सामंत हे सुपारी देऊन केलेल्या खूनाचे बळी आहेत. या पोलिसांच्या कबुलीमुळे त्यांचा खून हा प्रभावी टोळीकरवी त्यांच्या हितशत्रूनी घडवून आणला असावा या संशयास बळकटी येते. कामगार संघटना नेतृत्वामध्ये गुन्हेगारी टोळ्यांशी संबंध असलेला नवीन वर्ग उदयास येतो आहे हेच गवळी यांचे पुतणे सचिन अहिर यांची काँग्रेसप्रणित आरएमएमएसच्या मुख्य कार्यवाहपदी निवड होते यावरून दिसून येते. हाच कल (ट्रेन्ड) व त्याचबरोबर हळूहळू औद्योगिकरण कमी होणे हे महानगराच्या कामगार संघटना चळवळी पुढील मोठे आव्हान आहे. सामंत यांची पाशवी हत्या 'हिंसेला अधिक हिंसा मिळते' या सूत्रालाच पुष्टी देते.

युनियनचा लढाऊबाणा व गुन्हेगारी टोळ्यांची दंडुकेशाही व हीन गुन्हेगारी यांची समीकरण संपूर्णपणे अनपेक्षित आहेत. इकॉनॉमिक आणि पॉलिटिकल वकिलीच्या एका लेखकाने या खूनासाठी कोण जबाबदार असू शकेल यासंबंधी लिहिले आहे.

जागांचे मालक, औद्योगिकरणास खीळ घालू शकणारे, जमीन विक्रीला कडवा विरोध करणारे यांच्यासाठी सामंत एक डोकेदुखी होते? कॉर्पोरेट कंपन्यांचे नेते, प्रिमीयर ऑटोमोबाईल्सचे अधिकारी ज्यांच्या नोकरवर्ग कमी करून कंपनी अधिक कार्यक्षम बनवणाऱ्या स्वप्नास कडवा विरोध करत होते. त्या सामंतांना कंटाळले होते?

ठाकरे व त्यांचे अनुयायी ज्यांना सामंत लढाऊ कामगार चळवळीचे लोक तयार करतील व त्यायोगे सेना-भाजप युतीच्या कारभारातील वाढत्या भ्रष्टाचाराबद्दल जनमानसात काळजी निर्माण होईल? की हे गुन्हेगारी टोळ्यांचे कार्य होते ज्यांना मुंबईतील कामगार चळवळ खिळखिळी करायची आहे. ते टोळ्यांचे नेते आर्थिक सुधारणांचा जो मूर्ख मध्यमवर्गीयांचा लढा आहे, त्यांचा तालावर नाचत आहेत?

कामगार वर्गाचे शत्रू त्यांचा नेता नष्ट करण्यात यशस्वी झालेत. असा नेता जो मुंबईचे हाँगकाँग करण्याच्या अंधाऱ्या दिवसात कामगारांसाठी त्यांच्या हक्कासाठी लढण्याचे धाडस करत होता.

एकीकडे कापड गिरणी उद्योगाचे, पॉवरलूम्सची वाढ करून पद्धतशीर खच्चीकरण (नष्ट करणे) चालू आहे तर दुसरीकडे नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशनचा अधिकृतरित्या विचारपूर्वक नाश सुरू आहे. मुंबईच्या टेक्सटाईल संपाच्या

अपयशाची वरील कारणे दिली जातात. खरंच का मुंबईचा टेक्सटाईल संप अयशस्वी झाला? भारताच्या कापड उद्योगाच्या शवपेटीवर या संपामुळे अखेरचा खिळा ठोकला गेला काय? सामंत सांगत की, मुंबईच्या कापड उद्योगाचा संप महाराष्ट्रापुरता मर्यादित होता. व याची नाममात्रही प्रतिक्रिया अहमदाबाद, कानपूर, पं. बंगाल येथील कापड गिरण्यांत उमटली नाही. असे असताना कापड उद्योग अखेरच्या घटका मोजीत असल्याचे कसे म्हणता येईल. 1982 च्या कापड उद्योग संपाने बहुमत असलेल्या संघटनेस कायदेशीर मान्यता देण्याची जी मागणी होती ती पुढे आली. त्याचप्रमाणे बहुमताचा पाठिंबा हा गुप्त मतदान पद्धतीने ठरवावा. मुख्य म्हणजे 1982च्या संपाने कापड उद्योगातील कामगारांना नवीन ओळख मिळाली व त्यांना तिचा अभिमान आहे.

नोव्हे 1997 मध्ये पोलिसांनी सामंत खून केस बंद केली. कसलाही निकाल न लागता. 16 आरोपींची नावे घेतली त्यातले नऊ (टोळी प्रमुख छोटा राजन व गुरू साटम सह) जण परागंदा झाले होते. सचिन अहिरची पण जबानी घेतली. प्रीमियर ऑटोमोबाईल मधल्या युनियन्समधील अंतर्गत वैर याला जबाबदार आहे. युनियनचे लोक सांगतात सामंत व अहिर यांच्यात झगडा होत असे. अहिर मिल मालकांच्या जागा विकण्याच्या वादग्रस्त प्रस्तावाला पाठिंबा देत होते. अहिर यांची पोच आता शहरातील कापड उद्योगाचे बाहेरसुद्धा पोहचली. तसतसे त्यांचे वैर अधिक तीव्र झाले. मोदीस्टोनच्या शिवरी युनिटमधून सामंतांना हुसकून तिथे अहिर हे युनियन प्रमुख झाले. आजारी पब्लिक सेक्टरमधील मोठे इंजिनिअरिंग युनिट ‘रिचर्डसन क्रूडास’ मध्येही शिरकाव करण्याचा अहिरने प्रयत्न केला. आधीच्या वर्षी सामंतानी आरोप केला होता की व्यवस्थापनातील काही प्रतिनिधी अहिरला कारखाना फिरून दाखवत होते व कामगारांवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत होते. सामंताच्या युनियनपैकी एकाच्या म्हणण्याप्रमाणे अहिर यांच्या हालचाली बीआयएफआरच्या निर्णयाप्रमाणे होत होत्या. बीआयएफआरचा निर्णय सामंताच्या म्हणण्याप्रमाणे असा की या फर्मच्या मालकीच्या मुलुंड युनिटची 36 एकर जागा विकली जाऊ नये. जुलै 2000 मध्ये तीन संशयित खुनी (छोटा राजन व गुरू साटम टोळीशी संबंधित) पकडले गेले व त्यांना शिक्षा झाली. सामंतांच्या खूनाबद्दल. दादा सामंत या निकालाबद्दल असमाधानी होते. कारण त्यांना वाटले की खुनाबद्दल चिल्लर लोकांना शिक्षा झाली आहे पण त्यांना हा गुन्हा करण्यासाठी कोणी पैसे दिले हे कळणे जरूर आहे. सामंताच्या प्रीमियर ऑटो युनियनचे प्रतिस्पर्धी सुटून गेले.

श्री. बी. एस. घुगे सामंताच्या असोसिएशन ऑफ इंजिनिअरिंग वर्कचे उपाध्यक्ष यांच्या मते मुलुंड, भांडूप औद्योगिक विभागात ज्या कंपन्या आपल्या जमिनी विकू इच्छित होत्या, त्यांच्यात बरीच भांडणे होती, त्यांची चौकशी व्हायला हवी. आता बंद पडलेल्या एपीआय स्कूटर फॅक्टरी (मुथिया ग्रुपची) त्यांची 35 एकर जागा विकू पाहत होते, त्याला या नेत्यांनी (दत्ता सामंत) विरोध केला होता. बहुराष्ट्रीय कंपनी इंटरनिट एव्हरेस्ट ज्यांत भांडूपमध्ये 300 कामगार होते, तिने लोक ग्रुपशी तडजोड करून कामगारांना पगार द्यायचे ठरवले. सामंतांची युनियन म्हणते की कामगारांचे सक्तीने राजीनामे घेतले व बिल्डरने त्यांचे पगार दिले. जरी अफवाग्रस्त गिरण्या जास्त वेळ होत्या व अनेकांचा अंदाज असा होता की गिरणीमालकांनी जमिनी विकण्यास सामंताचा विरोध होता, त्यामुळे त्यांनी त्याचा खून करण्याची सुपारी दिली व ते खूनास जबाबदार आहेत. परंतु या बेकायदेशीर कृत्यांत त्यांचा सहभाग असल्याचा कोठलाच पुरावा मिळत नाही. त्यामुळे बहुतेक युनियन्सच्या अंतर्गत वैरांमुळे सामंतांचा खून झाला असावा असे वाटते.

मृत्यूपूर्वी एक महिनाच सामंतानी ‘बॉम्बे टाईम्स’ला एक मुलाखत दिली होती. त्यातले काही उतारे असे.

मला वाटते की सेना-भाजप सरकार हे जास्त धोकादायक आहे. कारण ते एका गोष्टीचे आश्वासन देतात

व ते अंमलात आणण्याची वेळ येताच पल्टी खातात. मनोहर जोशी नेहमी म्हणत असतात ''मी मिलच्या जमिनी विकू देणार नाही,'' पण गिरणी व कारखाना यांचे मालक बाळ ठाकरेंना भेटतात व त्यांच्याकडून मजूरमंत्री शब्बीर शेख यांना सूचना मिळतात. जेव्हा जोखीम मोठी असेल तेव्हा शेख कामगारांना धमकी देतात. उदा. कुलाब्यातील मुकेश मिल्स जिथे अत्यंत भारी किंमतीची 12 एकर जमीन आहे व त्या जमिनीची सध्याची किंमत 1000 कोटीहून अधिक आहे. गिरणी व कारखान्यांच्या जमिनी घरे किंवा व्यापारी संकुलांसाठी वापरता येत नाहीत - अर्थात जोवर शहरी विकास खाते जमिनीचा उपयोग उद्योगावरून व्यापारी किंवा घरबांधणीसाठी बदलून देत नाही. मिल मालकांना गिरणी चालवण्याची इच्छा नाही. व जेव्हा सरकारच मालकांपुढे नमून विक्रीस परवानगी देत असेल तर कोण गिरण्या चालवणार? दक्षिण मध्य मुंबईतील भारी मिलच्या जमिनींच्या चालू भावाची तुम्हाला कल्पना आहे का? हा काही कोटींचा प्रश्न नसून काही हजार कोटींचा आहे. त्यामुळे मालकांचा व सेना भाजप सरकारांसाठी याचा प्रचंड फायदा आहे. ही जणू काही सोन्याची खाणच आहे.

पुढच्या तीन वर्षांत काही गिरण्या उरणार नाही याची मला कल्पना आहे व मला काही काम उरणार नाही याची मला चिंता नाही. पण हे एक मोठे कटकारस्थान होते याचे दु:ख वाटत राहील. याच गिरणीकामगारांनी - मराठी माणसांनी सेनेला जन्म दिला व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेतला.

ठाकरेंचे नातेवाईक करीम मरेडिया नावाच्या संशयित खुन्याच्या बरोबरीने साकीनाका येथे टी. माणेकलाल इंजि. कम्पाऊंडमध्ये 16 एकर जागेवर एक संकुल उभारत आहेत. सध्या मी मुंबई व ठाणे येथील शेकडो एकर जागेवरील अशा तऱ्हेच्या अनेक प्रकल्पांच्या विरोधात लढत आहे. कॅलिको केमिकल्सची चेंबूरमधील60 एकर जागा, ठाण्यातील पॉययशा उद्योगाची 35 एकर जागा, ऑटोमोबाईल कंपनीची भांडूपमधील आणखी 35 एकर जागा शिवाय आणखी अनेक मिल्स व कारखान्यांच्या जागांच्या विक्री विरोधात मी आहे. अर्थात मला याची जाणीव आहे की मी फारकाळ तग धरू शकणार असे नाही. कारण धोरणे अशी आहेत की कामगारांचे मानसिक खच्चीकरण व्हावे.

सामंत हे अत्यंत हुशार व धूर्त संघटक होते. आर्थिक उदारीकरण व कंपन्यांच्या मालमत्तेच्या विक्रीवरील नियंत्रणे सैल करणे वगैरे गोष्टी कामगारांच्या हिताच्या विरुद्ध जाणार आहेत व ही लाट थोपवण्यासाठी आपण फार काही करू शकत नाही याची त्यांना पूर्ण जाणीव होती. सध्याच्या सुरक्षिततेच्या वातावरणात कारखाना बंद होणार अशी केवळ अफवा जरी पसरली तर कामगार स्वेच्छा निवृत्ती - ते देऊ करतील त्या दराने - पदरात पाडून घेण्यासाठी धावत जातील हे उदाहरण म्हणून त्यांनी सांगितले. जखमेवर मीठ चोळण्यासाठी गिरणीतले साचे रात्रीतून नकळत हलवले जातात. जे पाहून कामगारांचे नीतिधैर्य अजून ढासळते. त्यांनी मनोहर जोशी यांनी 1/3 जमीन विक्री सूत्र सुचवले होते, हे सूत्र पवारांनी आधीच कबूल केले होते. सामंतांनी ती आज्ञा अविश्वसनीय वाटली. व ते काही दिवसांपूर्वी मनोहर जोशींचा समोरासमोर बोलले. जेव्हा मुद्याची गोष्ट येईल तेव्हा1/3 चे सूत्र मालकांसाठी रद्द केले जाते. आता एनटीसी (नॅशनल टेक्सटाईल कार्पोरेशन)च्या गिरण्यासुद्धा विक्रीसाठी येत आहेत आणि आता राज्य सरकारला वापर बदलण्याची सूचना द्यावी लागेल. या सर्व व्यवहारात किती पैसा कोणाकोणाकडे जाईल हे थांबा व फक्त बघत रहा.''

मृत्यूलेख म्हणून मृत नेल्यास वाहिलेली श्रद्धांजली लक्षणीय ठरेल. एमएमआरडीएची प्रादेशिक योजना 1996-2001 वर नागरिकांची प्रतिक्रिया पाहण्यासाठी आयोजित सभेत ही श्रद्धांजली वाहण्यात आली. नारायण सुर्वे - प्रसिद्ध मराठी कम्युनिस्ट कवि व ज्यांना गिरणी कामगारांच्या एका कुटुंबाने सांभाळले व दत्तक घेतले होते. - यांनी ठासून सांगितले की ज्या कामगारांनी स्वातंत्र्य चळवळीत आघाडीचा भाग घेतला त्यांना मुंबईचे सिंगापूर वा हाँगकाँग बनवण्याच्या जोशात भिंतीत

रेटले जात आहे. नर्मदा धरणाविरुद्ध कठोर आंदोलन छेडणाऱ्या कट्टर पर्यावरणावादी मेधा पाटकर यांनी ही योजना म्हणजे मुंबईच्या सर्व नाशाचा नकाशा आहे अशी टिका केली. त्या म्हणाल्या, ''लोकांच्या विरोधी असलेल्या या योजनेची अंमल बजावणी ज्यांच्या हातात आहे ते एवढे शक्तीमान आहेत की ते आपण सर्वांना ठार करतील - केवळ डॉ. सामंतांना नव्हे अलिकडच्या काही वर्षांत परस्पर विरोधी शक्ती एकत्र येत आहेत. उदा. संघटनावाले, मानवीहक्क चळवळवाले, पर्यावरणवादी वगैरे व एक समान संघटना बनवू पहात आहेत. हीच मंडळी मे 1994 मधील अणुचाचणीच्या विरोधातील तक्रारीत आघाडीवर होती व त्याचवर्षी भाजपप्रणित युतीने प्रभावित अशा धर्मविरोधी हल्ल्याच्या विरोधातही.

### ठक्कर आणि रघुवंशी मिल्स

सामंताच्या मृत्यूनंतर तीनच महिन्यांनी गिरणगावातील तिसरा व शेवटचा खून झाला. दि. 17 एप्रिल 1997 मधील या खुनाने ही देशाची व्यापारी राजधानी हादरली. वल्लभभाई ठक्कर - रघुवंशी मिलचे मालक यांचा त्यांच्या गाडीतच दोन खुन्यांनी डोक्यांत गोळ्या झाडून खून केला. ज्या अर्थी ठक्कर यांनी स्वत:हून त्यांना बरोबर घेतले होते, त्याअर्थी ते एकमेकांस ओळखत असले पाहिजेत. पोलीसांच्या म्हणण्याप्रमाणे टोळीवाल्या खुन्यांना सदा पावले यांने पाठवले असावे असा संशय आहे. सदा पावले हा अरुण गवळीचा जवळचा साथीदार असून गवळी तुरुंगात असतांनी टोळीचे सर्व व्यवहार तो पहात असे. खुनी गिरणी मालकांकडून काही पैसे मागण्यासाठी त्यांना पाठवले होते. हे पैसे ठक्कर यांच्या भाडेकरूंनी जागा रिकाम्या करण्यासाठी त्यांचे मन वळवण्याबद्दल होते. (रघुवंशी मिलच्या कामगारांचे मते आरएमएमएसचा प्रमुख गवळीचा पुतण्या सचिन अहिर हा म्हणजे या व्यापारी मंडळीच्या (गिरणी मालकांच्या) खिशातील तंबाखूच्या पुडीसारखा आहे ते डॉकयार्डमधील रस्त्याने निघाले असावेत असे वाटते - गवळीचा जुना मालक (बॉस) हा डॉक युनियनचा पुढारी होता. त्याचे नाव बाबू रेशम असून माझगाव डॉकमधील अनेक लोक त्याचे पगारदार होते. तो नोकरीत होता तेव्हा डॉक ही सार्वजनिक क्षेत्रातली संस्था होती. पावले व त्याच्या माणसांकडे डॉक्सच्या खासगी रस्त्यांनी प्रवास करण्याचे परवाने होते. शिवडी येथील डॉक्सची जमीन भौगोलिकदृष्ट्या मिल्सच्या जमिनीजवळ आहे पण पुढे सहाव्या पाठात दिल्याप्रमाणे ह्या अत्यंत दु:स्थितीतील औद्योगिक जमिनी आहेत. काही महिन्यानंतर पावले स्वत: पोलिसांच्या गोळीचा बळी ठरला. खुनानंतर लगेचच शहरातल्या उद्योजकांचे एक शिष्टमंडळ पंतप्रधान इंदर गुजराल यांना भेटले व त्यांनी सेना-भाजप युतीच्या सरकारात राज्यातील कायदा व सुव्यवस्था ढासळत चालल्याची तक्रार केली. शिवसेना नेते बाळासाहेब ठाकरे यांनी ताबडतोब हे आरोप फेटाळून लावले व म्हटले'' ''झोपटपट्टी धारकांना हुसकून लावण्यासाठी ठक्कर यांनी गुन्हेगारी टोळ्यांची मदत घेण्याचा मूर्खपणा केला व त्याचे ते बळी ठरले. ही हत्या व्यक्तिगत वैरातून घडली असून समाजाचा तिच्याशी काहीही संबंध नाही. त्यांनी राज्यात शरद पवारांचे काँग्रेस सरकार असताना श्री. सुनीत खटाव यांची हत्या कशी झाली हेही विचारले. आरएमएमएसचे अध्यक्ष गोविंदराव आदिक यांनी अशाच भावना व्यक्त केल्या. हे अगदी उघड आहे की व्यक्तिगत संबंधातून ही हत्या झाली आहे. आणि तिचे कामगारांशी व गिरणीशी काहीही घेणेदेणे नाही. रघुवंशीची जमीन विकण्याचा कसलाही प्रस्ताव नव्हता. पी.एन.दादा सामंत, दत्ता सामंतचे बंधू, ज्यांनी कामगार आघाडीची सूत्रे आपल्या हाती घेतली होती. त्यांनी या मालकांच्या मृत्यूची जबाबदारी बिल्डर लोकांच्या लॉबीवर टाकली.

खटाव यांच्याप्रमाणे ठक्कर हे महत्त्वाच्या मिलमालकाचे वारस नव्हते. ते कापड दुकानदार होते असे म्हणतात व काळबादेवीचे मंगलदास मार्केट त्यांचे होते. तिथे ते कापड दुकानदार संघाचे अध्यक्ष होते व त्यांनी लोखंड व रसायनांच्या उद्योगात पण जोरदार प्रवेश केला

होता. त्यांनी अर्थातच बरीच माया जमवली असली पाहिजे. कारण त्यांनी काही नवीन चित्रपटांना पण अर्थसहाय्य कले होते. बिल्डिंग धंद्यात ही त्यांनी जोरदार प्रवेश केला होता व ते अजितसिंग ग्रुप ऑफ कंपनीचे मालक बनले होते. 1933 मध्ये मेहता कुटुंबाच्या तीन सदस्यांकडून रघुवंशी मिल त्यांनी विकत घेतली. ही मिल घेतानाच त्यांचे लक्ष मिलची जमीन विकून त्यावर घरबांधणी करण्यावर होते. तथापि 1989 साली गिरणी बंद पडली तेव्हा तिथे 1100 कामगार होते. गिरणी बंद होण्याचे कारण विक्रीच्या मुद्यावरून झालेला युनियन व मालकांमधील वाद. बीआरएफआरकडे आजारी गिरणी म्हणून ती पुनर्वसनासाठी आणण्यात आली व तिच्या आधुनिकीकरणासाठी ठक्कर यांनी 9 कोटी रुपये घातले असे म्हणतात व ज्यांमुळे गिरीणीला फायदा मिळू लागला. तिथे आता 800 कामगार होते व केवळ स्पिनिंगचे युनिट तिथे आता चालत होते. आता तिथे कापूस मिश्रित सूत आणि इतर कापड तयार होत होते. असे दिसत होते की त्यांनी गिरणीचे पुनरुत्पादन एवढ्यासाठीच केले होते की पुढे तिथे घरबांधणी करता यावी. ठक्कर यांनी शेजारची अंबिका मिल्स, जी बंद पडली होती, तीसुद्धा घेतली होती व तिथल्या जमिनीचा विकास त्यांचा खून झाला तेव्हा चालू होता.

या दोन गिरण्यांशिवाय ठक्कर यांनी अनेक ठिकाणी मालमत्ता विकत घेतली होती. वाळकेश्वर (ते राहत असलेल्या ठिकाणाजवळ), बाणगंगा (जुना तलाव व हेरिटेज जागा - ऐतिहासिक महत्त्वाच्या जागा तलाव भरून काढून त्यावर बांधकाम करण्यासाठी अनेक बिल्डरांचा डोळा होता) ब्रीच कॅण्डी, काळबादेवी व उपनगरात पोयसर या ठिकाणी. एकूण ठक्कर यांनी 11 इमारती खरेदी केल्या ज्यांचे एकत्रित मूल्य 150 कोटी रुपये असेल. दोन वर्षांपूर्वी गुन्हेगारी टोळ्यांच्या सूत्रानुसार वृत्तपत्रांनी असे नमूद केले होते की ठक्करांनी बाबूलनाथ जवळच्या इमारतीतून भाडेकरूंना हुसकून लावण्यासाठी अरुण गवळीची मदत मागितली होती. यापैकी एका भाडेकरूने पोलिसांना सांगितले की त्याला दोनदा भायखळ्याच्या दगडी चाळीत नेण्यात आले होते; दगडीचाळ ही अरुण गवळीची गुहा आहे. तिथे काहीतरी तडजोड करण्यासाठी ठक्कर यांनी त्याला नेले होते. त्याने 7 कोटी रुपये मागितले तर ठक्कर काही लाख रुपये द्यायला तयार होते. ठक्कर यांनी औरंगाबादच्या तुरुंगात जाऊन गवळी यांची भेट घेतली होती असा आरोप करण्यात येतो.

फेब्रुवारी 1998 मध्ये मनीष शहा - एक बिल्डर व ठक्कर यांचे जवळचे सहकारी त्याच्या वाळकेश्वर येथील घराजवळच गोळी लागून ठार झाले. ही हत्यादेखील गवळी टोळीनेच घडवून आणली असावी असा संशय आहे. त्या भागात ठक्कर व शहा यांनी तीन इमारती बांधल्या होत्या व त्यांच्या संरक्षणासाठी गवळीला कोट्यावधी रुपये दिले होते. या सर्व घटना पुन: कापड उद्योगाची घसरण, त्यांचे तथाकथित पुनर्वसन व त्यात गुन्हेगारी जगत व बिल्डर्स यांची अपवित्र युती याकडेच बोट दाखवतात. सप्टेंबर 1999 मध्ये रघुवंशी मिलच्या 1600 कामगारांनी गिरणीत, त्यांना पगार न मिळाल्या कारणांनी तक्रार करण्यासाठी धरणे धरले. त्यावेळी गिरणीचा तरुण मालक हेमंत ठक्कर लंडन येथे राहत होता.

नोव्हेंबर 1998 मध्ये गवळी टोळीचा पूर्वीचा एक सदस्य जो खबऱ्या म्हणून पोलिसांना येऊन मिळाला होता, त्याची इंडियन एक्सप्रेसच्या वार्ताहराने मुलाखत घेतली. या मुलाखतीची एक शृंखलाच प्रसिद्ध झाली. या मालिकेच्या पहिल्या भागाची सुरुवातच सनसनाटी होती. गर्दीपासून सावधान अशी होती. त्यात म्हटले होते, एक्सप्रेस आता कामावरून कमी केलेले कामगार व तरुणांच्या गुन्हेगारी जगताकडे जाणाऱ्या वाटेचा वेध घेणार आहे. हे जगत सध्या मुंबईतील नोकऱ्या निर्माण करणारे सर्वात मोठे स्थान आहे. पूर्वीचा गिरणी कामगार, जो नंतर माथाडी (डॉक पुढारी) पुढारी झाला. तो आता टोळीच्या परिभाषेत सामाजिक कार्यकर्ता स्वत:ला म्हणवून घेऊ लागला. त्याचे काम वकिलांना, खालच्या कोर्टातील मॅजिस्ट्रेटना, पोलिसांना लाच देणे व टोळीतील गुन्हेगारांची लवकर सुटका

होईल हे पाहणे असे होते. एप्रिल 1997 मध्ये त्याला दगडी चाळीतून बोलावणे आले. त्याला भरपूर मार बसला व त्याला फाशीची शिक्षा झाली. पण देवदयेने तो वाचला. त्याने कापड गिरण्यांच्या दुरावस्थेमुळे जुने कामगार गुन्हेगारीकडे कसे वळत आहेत हे तपशीलवार सांगितले. ही गोष्ट पुढे अशी.

परेल, वरळी, लालबाग, काळाचौकी, भायखळा व यांच्या आजूबाजूचे क्षेत्र हा गवळी व अमर नाईक यांचा परंपरागत बालेकिल्ला. मुंबईत एकेकाळी भरभराटीस आलेल्या गिरणगाव येथील पडक्या चाळी व शेवाळ्याने माखलेल्या व जमीनदोस्त झालेल्या कापड उद्योगाच्या सांगाड्यामधून टेहळणी करणारे गुप्त हेर घाईघाईने मार्ग काढत चाललेले असतात.

''गुन्हेगारी जगत बेकार गिरणी कामगारांच्या व औद्योगिक कामात तरूण मुलांना टिपते.''20 वर्षाचा अनुभवी गिरणीकामगार जो स्वत:ला फौजी (शिपाई) म्हणवतो, तो सांगतो. हे अगदी सहज सुरू होते. (त्यात काही वाईट असेल असे सुरुवातीस वाटत नाही) त्या तरुणांना एवढेच सांगितले जाते की त्यांनी एखाद्या व्यक्तीच्या किंवा पोलीसांच्या हालचालीवर लक्ष ठेवायचे किती वेळा विशिष्ठ पहारेकरी व्हॅन (पेट्रोल व्हॅन) कोणत्या विशिष्ट गल्लीत येते याची नोंद ठेवायची. त्यासाठी त्याला 2000 रुपये पगार मिळे. 800 ते 1000 रुपये मासिक उत्पन्न मिळणाऱ्या कुटुंबाला हा मोठाच बोनस वाटे. यात काहीच बेकायदेशीर नाही हे कळून व्यवहार पक्का होत असे.

पण हीच त्याच्या अध:पतनाची सुरुवात असते. एकदा का या दिनचर्येची त्याला सवय झाली की तो लोकांशी मैत्री करतो व हळूहळू दुर्गुण संपादन करतो, त्याचवेळी टोळी त्याला पकडून देते. आम्हीच त्याच्या अटकेची व्यवस्था करतो. बहुधा एखाद्या छोट्याशा आरोपावरून. मुलगा जेव्हा तुरुंगातून बाहेर येतो तेव्हा आम्ही त्याला त्याचे पहिले काम देतो. ते काम त्याने यशस्वीरित्या पूर्ण केले म्हणजे तो पदवीधर होतो. आता गुन्हेगारी टोळीतील कारकीर्द सुरु करण्यास तो पात्र होतो.

या व्यवसायात मुले भरती करण्याचा आणखी एक मार्ग. युनियन्स मधूनच मुलांना निवडून ज्या गिरण्या नाममात्र चालू आहेत तिथे त्यांना काम देणे किंवा माथाडी टोळ्यांमध्ये काम देणे. त्यांचे तिथले काम म्हणजे फक्त महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाऊन पगार घेऊन येणे. एकदा या मुलांवर कृतज्ञतेचे ओझे लादले की मग टोळीवाले त्यांच्याकडून परतफेड मागू लागतात. अरुण गवळी, रामा नाईक, अमर नाईक, या सर्व गिरणी कामगारांच्या अपत्यांनी याच तऱ्हेने त्यांच्या कारकीर्दीची सुरुवात केली व काही वर्षात व्यवस्थापनास आरएमएमएससारख्या युनियन्सचे पद्धतशीर गुन्हेगारीकरण करण्यास त्यांचे मन वळवले. आरएमएमएसने कामगारांच्या स्वेच्छानिवृत्ती योजनेच्या फंडात देखील युनियनला भागीदारी मिळेल याची व्यवस्था केली आहे. फौजी म्हणतो की, आमचे दु:ख हे आहे की हा तथाकथित कामगारांचा प्रतिनिधी फालतू व्यवस्थापनांना विकला गेला आहे व तो जवळजवळ या टोळ्यांचाच एक भाग बनला आहे.

जोवर गिरण्या चालू होत्या तोवर कामगारांचे समाजिक जीवन सुव्यवस्थित चालले होते. असे गिरीश श्रीनिवासन् राजकीय अर्थ व्यवस्थेच्या संशोधन युनिटचे अर्थशास्त्रज्ञ म्हणतात. ऐंशीच्या सुरुवातीपासून मोडतोडीस सुरुवात झाली त्यामुळे तो साचा पूर्ण मोडून त्याचे तुकडे झाले, विशेषत: परेल, लालबाग व वरळी भागात. आर्थिक ताणाशिवाय या मोडतोडीमुळे आपले मूळ हरवल्याची अवस्था निर्माण झाली. कामावरून कमी केलेल्या स्थलांतरात कामगारांच्या मुलांचे बाबतीत हे विशेषत्वाने दिसून येते, असे सनोबर शेखर हे गुन्हे व गुन्हेगारी यांचे अभ्यासक म्हणतात. या दुसऱ्या पिढीतील स्थलांतरितांना परत जाऊ म्हटले तर स्वत:चे गाव (खेडे) नाही. मुंबई हे त्यांना माहीत असलेले एकमेव घर. तेव्हा आता शहरी वातावरणात असूनही तुटल्यासारखे वाटणारा वर्ग आपल्यात आहे. भावना प्रकटीकरणाच्या शहरी वातावरणात हे सगळे मारणारे रसायन आहे, तेव्हा आपण शांत राहू या असे त्यांना म्हणावेसे वाटते.

जुनी औद्योगिक रचना मोडून पडत आहे याची पूर्वकल्पना जर कोणाला आली असेल तर ती डॉ. दत्ता सामंतांना. त्यांनी दिलेला शेवटचा लढा हा प्रिमीयर ऑटोमोबाईल व्यवस्थापनाशी होता हे आपण पाहिले. कापड गिरणी संपाप्रमाणे असे दिसते की ते त्यातही अत्यंत वाईट तऱ्हेने ते पराभूत झाले आहेत. नोव्हेंबर 1996 मध्ये 80टक्के प्रिमीयर ऑटोमोबाईल कामगार पाच महिन्यांच्या प्रदीर्घ टाळेबंदीनंतर कामावर रुजू झाले. रुजू होताना शिस्त पालन व उत्पादन यांची हमी देणाऱ्या करारावर त्यांनी सह्या केल्या. अंतर्गत युनियन त्यांनी स्थापन केली व सामंतांच्या सर्वात प्रभावी असोसिएशन ऑफ इंजिनिअरिंग वर्कर्स ही संघटना त्यांनी सोडून दिली. याच कंपनीत 1979 च्या 14 दिवसांच्या टाळेबंदीनंतर व्यवस्थापनाचे सामंतांच्या युनियनशी करार करून मोठी पगारवाढ एकूण उत्पादनाशी निगडीत अशी दिली होती. नाशिक-मुंबई-ठाणे-पुणे विभागातील अनेक उद्योगांत असेच करार अस्तित्त्वात आले. ट्रेड युनियनच्या किल्ल्याचा मी शेवटचा बुरुज आहे, अशी सामंत बढाई मारत असत. मी ज्या मुद्यांवर लढे उभे करतो तो ट्रेड युनियनीपेक्षा जास्त विशाल व मोठे आहेत. आर्थिक उदारीकरण व ते ज्या दिशेने जात आहे त्याची गरज आहे काम व त्याचा मूळ उद्देश यांनाच माझा आक्षेप आहे. दुर्दैवाने असा आक्षेप घेणारा मी एकटाच आहे.

नव्वदनंतर संपांची संख्या व देशातील संपामुळे वाया गेलेले मनुष्यदिवस दिवसेंदिवस कमी होत आहेत. देशाच्या मजूर मंत्रालयाच्या आकडेवारीप्रमाणे 1991 मध्ये 1810 संप झाले पण 1996च्या पहिल्या सहा महिन्यात फक्त 252 संप झाले. 1991 मध्ये संपामुळे 12.42 दशलक्ष मनुष्यदिवस वाया गेले पण दोन वर्षानंतर ही संख्या 5.61 दशलक्ष होती म्हणजे 1991च्या निम्म्याहून कमी. परंतु टाळेबंदीमुळे वाया गेलेले मनुष्यदिवस मात्र 1991 मधील 14 दशलक्षावरून 1993 मध्ये 14.68 दशलक्ष होते. यावरून असे दिसते की कारखान्यांची व्यवस्थापक वर्ग जात आक्रमक होऊ लागली व आपसातील तंटे बसून सोडवण्यापेक्षा आपले दरवाजे बंद करणे त्यांनी पसंत केले. बिझिनेस इंडिया लिहितो ट्रेड युनियन्सच्या वृत्तीमध्ये जाणवणारा बदल आर्थिक उदारीकरणामुळे निर्माण झालेल्या जबरदस्तीचा परिणाम म्हणता येईल. कामगार मंडळीची वरवर जाण्याची इच्छा व चांगल्या जीवनमानाची अपेक्षा यामुळे त्यांच्या आर्थिक गरजा वाढल्या. स्वेच्छानिवृत्ती व तशाच योजनांमुळे कामगारांची पैसे मिळवण्यास जास्त पसंती मिळू लागली. त्यामानाने कामगारांच्या हक्कांकडे तितके लक्ष राहिले नाही. त्यामुळे सहाजिकच काम बंद करून आपला पगार बुडवणे त्यांना पसंत नव्हते. श्रीराम मिल्सची गोष्ट तर खूप गमतीची आहे. युनियन्सचे दडपण असूनही कामगारांची स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली व व्यवस्थापकांना आपली मालमत्ता बिल्डर्सना विकायलाही परवानगी दिली. प्रत्येक कामगाराला साधारण 2 लक्ष रुपये मिळाले. कामगारांचा कल जास्त प्रागतिक विचार करण्याकडे होता, परिस्थितीचा संकुचित विचार करण्याकडे नव्हता. मिल पुन्हा सुरू होण्याची श्रीराम मिल्सबाबत कोणतीही आशा नव्हती. कामगारांना पगार मिळत नव्हते. आंदोलनाची निरर्थकता उघड दिसत होती व त्यामुळे कामगारांनी युनियनकडे पाठ फिरवली.

पण जागेवरील वस्तुस्थितीचे खरेखुरे चित्र वरील वर्णनात दिसत नाही.

नोव्हेंबर 1998 मध्ये पुणे विद्यापीठाच्या सोशॉलॉजी डिपार्टमेंटच्या प्रमुख डॉ. सुजाता पटेल व पॅरिस येथील सेंटर ऑफ स्टडी ऑफ साऊथ एशियाच्या डॉ. ॲलिस थॉर्नर यांचेबरोबर एका चर्चासत्रासाठी एकत्र काम केले. वर्क अँड वर्कर्स इन मुंबई. 1930 ते 1990 (मुंबईचे काम व कामगार) या विषयावर एशियाटिक सोसायटी ऑफ इंडिया येथे हे तीन दिवसीय चर्चासत्र आयोजित केले होते. (या दोघांनी पूर्वी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेससाठी ''सोशोइकॉनॉमिक सिच्युएशन ऑफ मुंबई अँड इट्स कल्चर'' या विषयावर दोन पुस्तके संपादित केली होती. डिसेंबर 1992मध्ये अशाच तऱ्हेचे चर्चासत्र एस.एन.डी.टी. विद्यापीठाने आयोजित केले होते, त्यावर ही पुस्तके आधारित होती) लेखकाने वरील चर्चासत्रात एक निबंध

वाचला होता, त्याचे नाव 'रीडेव्हलपमेंट ऑफ मुंबईज कॉटन टेक्सटाईल मिल लँड - ऑपर्च्युनिटी लॉस्ट'' असे होते. हा निबंध नंतर इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल विक यात प्रसिद्ध झाला होता व इतर काही अॅकॅडमिक जर्नल्स वा न्यूजलेटर्समध्ये संपूर्ण किंवा थोडा भाग पुनर्मुद्रित झाला होता. श्रीराम मिल केस स्टडी हा खूप तपशीलात जाऊन केला गेला व त्यासाठी जीकेएसएसच्या मुख्य कार्यवाह व वकील गायत्री सिंग यांनी भरपूर साहित्य पुरवले. आधीच्या तीन केसेस त्यातूनच घेतल्या आहेत.

**श्रीराम मिल्स - तपशीलवार अभ्यास**

एका गिरणीच्या पुनर्विकासाचा तपशीलवार अभ्यास हे दाखवून देतो की गिरणीमालकांनी राज्य व आर्थिक संस्थांशी संमगनमत करून कामगारांना त्यांच्या हक्कापासून कसे वंचित केले. 1982-83 च्या कापड गिरणी संपापूर्वी श्रीराम मिल्सकडे लोअर परेल येथे 9 हेक्टर्स (20 एकर) जागा होती व 6000 कामगार होते. आजारी औद्योगिक कंपनी कायद्या (सीआयसीए) खाली गिरणी आजारी ठरवण्यात आली. 1991मध्ये तिने बीआयएफआरकडे पुनरुत्थान योजना पाठवली, जी त्याच वर्षी ऑक्टोबरमध्ये मंजूर झाली. कंपनीला 3500 कामगार ठेवून घ्यायचे होते. याचाच अर्थ गिरणीचे पुनर्वसन करताना कोणालाही काढून टाकायची आवश्यकता नव्हती. नवीन मशीन्स (24 एअरजेट लूम्स सहित) गिरणीत बसवायची होती व 1992-1993 मध्ये गिरणीचे आधुनिकीकरण पूर्ण व्हायचे होते व हे काम पूर्ण करण्यासाठी 1.2 लक्ष चौ.फूट 1994 पर्यंत विक्री करून किंवा पुनर्विकास करून 1.1 कोटी रुपये उभे करायचे होते. त्याबद्दल अनेक सवलती प्रवर्तकांना देण्यात आल्या. जीकेएसएसच्या म्हणण्याप्रमाणे त्या पुढीलप्रमाणे असतील.

1) आर्थिक संस्था व बँक्सनी शिक्षापात्र व्याज व धंदा गुंडाळण्याबद्दलची नुकसान भरपाई रद्द करावी.
2) 1986 ते 1990 च्या काळात कर्जावरचे व्याज नेहमीच्या 10 टक्काऐवजी फक्त 6 टक्के आकारण्यात यावे.
3) महाराष्ट्र सरकारने सेल्स टॅक्स, इलेक्ट्रीसिटी थकबाकी, यांच्या थकबाक्यांवरील व्याज व दंड माफ करावा मिलला वीजेचा पुरवठा अग्रक्रमे करायचा आहे.
4) मुंबई म्यु. कॉर्पोरेशनने आधीची थकबाकी (पाणी पुरवठा व मालमत्ता कर) भरण्याचे पुनर्वेळापत्रक तयार करावे व 1991 ते 1996 या मुदतीचे व्याद रद्द करावे.
5) इन्कम टॅक्सच्या काही तरतूदींमधून मध्यवर्ती सरकारने कंपनीला वगळावे व कंपनीला कॅपिटल गेन्स टॅक्समधून सूट देण्याची विनंती मान्य कारावी.

एकदा ही योजना मान्य झाली म्हटल्यावर अनेक खाती बंद करण्यात आली असा जीकेएसएसचा आरोप आहे. कसलेही आधुनिकीकरण करण्यात आले नाही. कामगारांना अनेक वर्षे नुसते बसवून ठेवले, काम न देता व त्यामुळे नुकसान वाढत गेले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे जेव्हा या योजनेला हिरवा झेंडा दाखवला गेला तेव्हा 1.2 लक्ष चौ. फुटांची अतिरिक्त जमीनच शिल्लक नव्हती. हीच कथा इतर गिरण्यांची सुद्धा होती. प्रवर्तकांनी आयडीबीआयच्या ऑपरेटिंग एजन्सीच्या संगनमताने परवानगी मिळवली व नंतर वेगवेगळी खाती बंद केली.

याच काळात प्रोसेसिंग खात्याचा काही भाग पाडून त्याचे अतिरिक्त जमिनीत रुपांतर केले गेले. कामगारांना दुसऱ्या खात्यात बदलून त्यांना रिकामे बसवले. फेब्रुवारी 1992मध्ये विव्हिंग डिपार्टमेंटचे काही विभाग बंद करण्यात आले व त्याच्या पुढच्या वर्षी स्पिनिंग डिपार्टमेंटची हीच गत झाली. 1993-94मध्ये 2000 कामगारांना राजीनामा देण्यासाठी भाग पाडण्यात आले, जरी ही कृती योजनेच्या गाभ्याशी विसंगत होती. त्याचे कायदेशीर मार्गाने जे काही त्यांचे होते तेही जाऊ नये या भीतीने एका दिवसांत 2200 कामगारांनी राजीनामे दिले. मंजूर योजनेच्या कोणत्याही तरतूदींची पूर्तता झाली नव्हती. तरीही प्रवर्तकांविरुद्ध कसलीही कारवाई झाली नाही. (1996 मध्ये पूर्ण कामगार वर्ग, जो आधीच 1400 पर्यंत कमी झाला होता, त्यांनी एक गठ्ठा राजीनामे दिले व स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. आतापर्यंतच्या कापड उद्योगाच्या इतिहासात कधीही

न दिलेले पॅकेज कामगारांना देण्यात आले. त्यांच्या साठलेल्या थकबाक्या, बोनस, ग्रॅच्युइटी व इतर कायदेशीर येणी या रक्कमांशिवाय प्रत्येकाला 1.7 लक्ष रुपये राजीनाम्यानंतर एक वर्षाने देण्यात आले. आरएमएमएसचा या व्यवहारास विरोध होता. त्यांचा असा दावा होता की या व्यवहारामध्ये ॲपीलेट ॲथॉरिटी फॉर इंटस्ट्रियल अँड फायनान्शियल रिकन्स्ट्रक्शन (एएआयएफआर)ने दिलेल्या पुनर्वसन पॅकेजचा भंग होतो. एक मालक विकास कास्तीवाल यांनी सांगितले की त्यांनी स्वेच्छानिवृत्ती योजनेचा एक लाभ फक्त300 कामगारांपुरताच मर्यादित ठेवला. वास्तविक इतर सर्वांची मागणी तीच होती.

प्रोसेसिंग डिपार्टमेंट पाडून टाकण्यावर व्यवस्थापनाने प्रथमच 59000 चौ.फूट अतिरिक्त जमीन बाजूला काढली. ती एफएसआय म्हणून विकली. इतकेच नव्हे तर प्रवर्तकांनी ही जमीन किंवा एफएसआय विकून टाकली व त्यासाठी आवश्यक असलेली असेट व सेल कमिटीपण नेमली नाही. एकदा हे नाटक संपल्यावर प्रवर्तक आणखी एक प्रस्ताव घेऊन बीआयएफआरकडे गेले. पण त्यांनी ते फेटाळून लावले. ते मग एएआयएफआरकडे गेले व त्यांनी नवीन पुनर्वसन योजना मंजूर केली. ऑक्टोबर 1994 मध्ये. आर्थिक संस्थांची देणी एकाचवेळी भागवणे, स्वेच्छा निवृत्ती योजनेद्वारे अतिरिक्त कामगारांना काढून टाकणे, अतिरिक्त जमिनीची विक्री न चालणारे गिरणीचे विभाग बंद करून गिरणीची आपरेशनल पुनर्रचना व गिरणीचे अंशत: आधुनिकीकरण ही या योजनेची वैशिष्ट्ये होती. यावेळी विव्हिंग डिपार्टमेंट पूर्णत: बंद करण्यात आले व स्पिंडल्सची संख्या 1,22,576 वरून 40 हजार  करण्यात आली. प्रोसेस केलेल्या कापडाची लांबी दररोज 80 मीटरवरून 50 हजार मीटरवर आली व ज्यात 19 हजार मीटर मांजरपाट बाहेरून विकत आणले जात होते. कामगारांची संख्या 1450 वर आली. जीकेएसएसच्या म्हणण्याप्रमाणे आधुनिकीकरण योजनेचा खर्च फारच अतिशयोक्तीपूर्ण होता. उदा. पहिल्या योजनेचा खर्च 3.67 कोटी येणार होता. ज्यावेळी सर्व खाती अंशत: आधुनिक होणार होती. दुसऱ्या योजनेखाली भांडवली खर्च 4.56 कोटी रुपये दाखवला होता, जेव्हा स्पिनिंगचे काम पूर्वीच्या 1/3 इतके कमी झाले होते. कामगारांच्या हितावर एवढा मोठा घाला घातला गेला तरी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले नाही. जेव्हा निरनिराळ्या खात्यांमध्ये खाती बंद होत असल्याच्या नोटीसा लागल्या तेव्हाच त्यांना ताज्या योजनेबद्दल समजले. त्यानंतर विव्हिंग डिपार्टमेंटमधले सुमारे 400 कामगाराचे पगार थांबवण्यात आले. त्यांना यासाठी मजूर कोर्टात केसेस दाखल कराव्या लागल्या ज्या अनिर्णित होत्या. मंजूर योजनेविरुद्धची याचिका हायकोर्टात दाखल केली ती दाखल करून घेऊन कोर्टाने योजनेला स्थगिती दिली. कंपनीने तेव्हा सुप्रीम कोर्टात स्पेशल लीव्ह पिटीशन दाखल केली. सुप्रीम कोर्टाने योजनेच्या कार्यवाहीस परवानगी दिली परंतु जमिनीच्या विक्रीस स्थगिती दिली. हायकोर्टाने दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकावे असा आदेश देला व ही केस पुन: हायकोर्टाकडे सोपवली.

जमीन किंवा एफएसआयची विक्री किंवा बदली या गोष्टी बाहेर सार्वजनिक होतील अशी जाणीव झाल्यामुळे कंपनीने मिल कमिटी श्रीराम कामगार संघटनेशी समझौता करण्याचे ठरवले. त्यांचा अध्यक्ष जो शिवसेनेचा कार्यकर्ता होता. त्याने जीकेएसएसला न कळवता समेट पत्रावर सही केली. वास्तविक जीकेएसएसने ही केस कोर्टात लढवली होती, त्यांचेशी सल्लामसलत करायला हवी होती. कमिटीने हायकोर्टातील केस काढून घेण्याचे ठरवले व प्रत्येक कामगारासाठी 1 लाख जादा स्वेच्छानिवृत्तीपोटी घेण्याचे मान्य केले. पण जीकेएसएसने केस माघारी घेण्यास नकार दिला, सर्वसाधारण सभेने यास मंजूरी दिल्याशिवाय केस मागे घेता येणार नाही. अशी सभा बोलावण्यात आली व जीकेएसएसने स्वेच्छानिवृत्ती कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारू नये अशी त्यांना विनंती केली. तथापि कामगारांनी ही नुकसानभरपाई स्वीकारण्याची त्यांची इच्छा असल्याचे जाहीर केले. त्यामुळे जीकेएसएसनी सांगितले की,

अशा निर्णयात कामगाराच्या पाठीशी आम्ही उभे राहू शकत नाही व म्हणून केस मागे घेत आहोत.

कामगारांबरोबर बोलणी चालू असतानाच ऑक्टो1996 मध्ये व्यवस्थापनाने आणखी एक सुधारित योजना पुढे आणली. त्यानी असा दावा केला की ही योजना बव्हंशी अंमलात आणली जात असतानासुद्धा कंपनीला बराच तोटा होत आहे. या नव्या योजनेनुसार आणखी कामगार कपात, अधिक भांडवली खर्च (आधुनिकीरण व नवीनिकीरणांसाठी) व आणखी 309,392 चौ.फूट जमिनीची विक्री या गोष्टी अंतर्भूत होत्या. या औदार्याची परतफेड म्हणून कंपनीने 7.7 कोटी रुपये प्रवर्तकांची वर्गणी म्हणून उभी करण्याचे ठरवले, जी ते आर्थिक संस्था व बँकांना देतील. त्यांनी केलेल्या त्यागाबद्दल अंशत: नुकसान भरपाई म्हणून हे एएआयएफआर शब्द आहेत. बेंचने कंपनीच्या प्रस्तावावरून सुधारित योजना बनवण्यास आयडीबीआयला सांगितले.

कंपनीने भांडवली खर्चात 4.56 कोटीवरून 30 कोटीवर वाढ सूचवली, आणि कामगारांना द्यायची नुकसान भरपाई 20 कोटीवरून 65 कोटीपर्यंत वाढवली. आधी सूचवलेल्या विशिष्ट प्लॉटच्या 41 कोटी रुपये किंमतीशिवाय अतिरिक्त जमीन वा एफएसआयची विक्री 21 कोटीवरून 107.6 कोटीपर्यंत वाढेल व मशीनवरची विक्री 1.65 कोटीवरून 3 कोटीपर्यंत वाढेल. मिल 40 हजार ऐवजी 30 हजार स्पिंडल्सवर चालेल व रोज 50 हजार मीटर कापडाचे प्रोसेसिंग होईल. 5 कोटीपर्यंतचा भांडवली खर्च, परिषदा, दळणवळण, संगणकीकरण यांच्या अत्याधुनिकीकरणासाठी खर्च होतील. यामुळे ऑफिस व व्यापारी आस्थापनांचा बिझिनेस सेंटर म्हणून उपयोग होऊ शकेल. मार्च 1996 मध्ये कंपनीने 8000 चौ. फू. जागा मे-अवध एस्टेट सर्व्हिसेसला लीज रेंटवर (60 फूट दर चौ. फूट द.म.) बिझीनेस सेंटरसाठी दिली. जून अखेर कंपनीने 19 लाख रुपये यातून मिळवले. एएआयएफआरच्या मते कंपनी अशा तऱ्हेची उद्योग मोठ्या प्रमाणावर करून 20 हजार चौ. फू. जागा वेगवेगळ्या पार्टीजना देऊ शकेल. - ज्याचा परिणामस्वरूप हे तीन भाडे 100 रु दर चौ.फू.द.म एवढे वाढू शकेल. व त्यातून 2.4 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळू शकेल.

सतत चालणाऱ्या कामगारांच्या त्रासामुळे कंपनीने1200 कामगाराबरोबर एक सामंजस्याचे निवेदन पत्र तयार केले (मेमोरॅन्डम ऑफ अंडरस्टॅडिंग). या 1200 कामगारांची स्वेच्छानिवृत्ती योजना लागू केली होती. त्यानुसार नोकरीच्या प्रत्येक वर्षासाठी 36 दिवसांचा पगार, ग्रॅच्युईटी व अर्जित रजा व प्रत्येक कामगारास 1.7 लक्ष रुपये मिळणार होते. बहुतेक सर्व कामगारांनी हे मान्य केले व कंपनीच्या अंदाजाप्रमाणे त्यांना 45 कोटी रुपये यासाठी खर्चावे लागतील. याआधी 200 कामगारांना काढून टाकताना द्यावे लागलेले 20 कोटी रुपये धरून स्वेच्छानिवृत्तीसाठी एकूण 65 कोटी खर्च येणार होता.

या पुनर्वसन पॅकेजचा एक भाग म्हणून आर्थिक संस्थांना 2 कोटी व बँकांना 5.7 कोटी रुपये कंपनीकडून मिळतील. बँकांना जर ही रक्कम अपूरी वाटली तर त्या कोर्टात कंपनीला आव्हान देऊ शकतात. महाराष्ट्र सरकारला श्रीराम मिलला अतिरिक्त 30 हजार चौ.फू. जमिनीचा पुनर्विकास किंवा विक्री करण्यास परवानगी देण्याबद्दल विनंती करण्यात आली. (डी.सी. रुल्स खाली) कंपनी 1997-98 या दुसऱ्या वर्षात असलेली पूर्ण क्षमता वापरून 79 कोटीची उलाढाल करेल व त्यावर 11.0 कोटीचा फायदा मिळवेल अशी अपेक्षा होती. पण हे होण्यासाठी 60 टक्के सूत मिलच्या बाहेरून अंगावर काम देऊन विणून घ्यावे लागणार होते. त्याचप्रमाणे मिलला आणखी 55 लक्षमीटर मांजरपाट विकत घ्यावे लागले असते. मांजर पाटाचे (ग्रे क्लॉथ) पूर्ण उत्पादन 110 लक्ष मीटर्स देखील बाहेरून अंगावर काम देऊन (जॉब वर्क) प्रोसेस करून घ्यावे लागले असते. शिवाय कंपनीला83 लाख मीटर प्रोसेस्ड कापड विकत घ्यावे लागले असते. पण कळीचा मुद्दा हा होता की आता फक्त 85 कायम कामगार व 104 कॉन्ट्रॅक्टवरचे कामगार फक्त उरले होते.

गिरणीच्या पुनर्वसनासाठी तयार केलेल्या तीन योजनांचे हे नागमोडी वळणावळणाचे लंबलचक वर्णन वाचल्यावर हे अगदी स्पष्ट दिसते की प्रवर्तकांचा खरा हेतू मिलची मालमत्ता शक्य तेवढ्या लवकर विकून कामगारांनाही काढून टाकायचे हा होता. बीआयएफआरला मिलमध्ये जे काय चालले आहे ते कोणत्याही अर्थाने पुनर्वसन होते असे कसे काय वाटले हे मोठे गूढ आहे. 1 लाख 20 हजार चौ.फू. अतिरिक्त जमीन गिरणीकडे नसताना प्रथमत: हा प्रस्ताव आलाच कसा ही गोष्ट पुरेशी बोलकी आहे. पुढच्या प्रत्येक वेळी सुधारित योजनेचा खर्च वाढवून सांगण्यात आला जेव्हा एकेक खाती हळूहळू बंद केली जात होती. ज्या गिरणीत 3500 कामगार होते ती गिरणी फक्त 200 कामगारांवर चालू शकते असे भासवणे हे मुळातच अतिशय हास्यास्पद होते.

श्रीराम मिल्स - पुनर्वसन योजना

| **योजना** | **कामगार संख्या** | **स्पिंडल्स संख्या** | **प्रोसेस्ड★ कापड मी.** | **विक्रीची जमीन चौ.फू.** |
|---|---|---|---|---|
| 1991 | 4000 | 122576 | 50000 | 120000 |
| 1994 | 1400 | 40000 | 50000 | 120000 |
| 1996 | 200 | 2500 | 50000 | 301000 |

★ काही कापड बाहेरून प्रोसेस करून घेतलेले.

(गायत्री सिंग जीकेएसएस यांचे सौजन्याने)

बीआयएफआर किंवा त्यांच्या पुनर्विचार अधिकाऱ्याने कोणत्याही टप्प्यावर त्याचे वर देखरेख केली नाही. आर्थिक संस्था व बँका यांचा संबंध फक्त आपली येणी वसूल करण्यावर होता व लीड एजन्सी म्हणून यातील आयडीबीआय बँकेची भूमिका संशयास्पद होती. एएआयएफआरने आयडीबीआय वर हे काम सोपवले होते की प्रवर्तकांनी आणखी 2 कोटी रुपये देण्यासाठी दिलेली हमी, वचने यांचे स्वरुप व अटी समाधानकारक आहेत का नाहीत याची जबाबदारी त्यांनी घ्यावी. जेव्हा पद्धतशीरपणे मिलची मालमत्ता व कामगार वर्गाची कपात केली जात होती तेव्हा एकूणच सादर करण्यात आलेल्या योजना मिलच्या पुनर्वसनास कशी काय मदत करत होत्या? स्पिंडल्सची संख्या 1/4 पर्यंत कमी करण्यात आली व कापडाचे उत्पादन बाहेर करून घेण्यात येत होते. या सर्व सव्यापसव्याचा उद्देश, प्रवर्तकांनीच कबूल केल्याप्रमाणे बिझीनेस सेंटरसाठी जास्त जागा तयार करणे हा होता.

बऱ्याच उशीराने ऑगस्ट 1997 मध्ये मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी मान्य केले की श्रीराम मिल्सनी आपली जागा दुसऱ्या कंपनीला (रिलायन्स इंडस्ट्रीज) परवानगी न घेता भाडेपट्ट्याने दिली आहे. राज्य सरकारने एएआयएफआरला कळवले की श्रीराम मिल केसचा उच्चस्तरावर विचार चालू आहे व कोठल्याही घाईगर्दीच्या निर्णयाचा परिणाम इतर मिल्समधील अशासारख्या योजनावर होऊ शकेल. या केसमध्ये डीसी नियमांचे उल्लंघन व इतर काही अनियमिततेच्या आरोपांच्या चौकशीसाठी एक समिती नेमण्यात येत आहे. व कोरिया कमिशनच्या नेमणूकीमुळे राज्य सरकारने मिलच्या कंम्पाऊंडमध्ये कसलीही विकासकामे करण्यास व अन्य काहीही करण्यास सर्वसाधारण बंदी घातली आहे.

1998 मध्ये महाराष्ट्र सरकारने मिलच्या आवारात विकास करण्याच्या बंदीतून श्रीराम मिलला सूट दिली व सुमारे 5490 चौ. फूटावर केलेले प्लॅट्सचे बांधकामास मंजुरी दिली, जरी याला शहरी विकास मंत्रालय व टेक्सटाईल मंत्रालयाचा विरोध होता. तरी या मुद्यावर राज्याच्या अॅडव्होकेट जनरल यांचे मत घेतले तेव्हा त्यांनी सांगितले की म्यु. कॉर्पोरेशनने डीसी रुल्स खाली दिलेली परवानगी (रेसिडेन्सियल व कमर्शियल पर्पझ ही कायदेशीर आहे. टेक्सटाईल मंत्रालयाने हे मुद्दाम नमूद केले होते की परवानगी फक्त मिलच्या आधुनिकीकरणासाठी विकास व पुनर्विकास करण्यासाठी दिलेली होती. दोन्ही मंत्रालयानी मिलच्या ऑफिसचा काही भाग खासगी कंपन्यांना व तो सुद्धा परवानगी न देता भाड्याने देण्याबद्दल आपला विरोध नोंदवला होता. जीकेएसएसने सरकारवर कामगारांच्या जीवावर गिरणी मालकांवर मेहेरनजर केल्याचा आरोप केला.

1999 मध्ये जनतादल कार्यकर्ते श्री संजीव चिंबूलकर यांनी रिपिटीशन दाखल केली. त्यात म्हटले आहे की अर्बन लँड सिलिंग ॲक्टच्या तरतूदींचे बहुतेक सर्व मिल्सनी उल्लंघन केले आहे. त्यांनी आरोप केला की त्यांची माहिती अशी आहे की गोविंदराव आदिक राज्यसभा एमपी यांनी श्रीराम मिलकडून जुने माग (100 मीटर) घेतले व ते कोपरगाव (त्यांचे गाव) येथे बसवले. श्रीराम मिलच्या आवारात 'साक्षी' नावाची पहिली आर्ट गॅलरी मिल भागात सुरू झाली. एका मोकळ्या पडलेल्या शेडमध्ये ती सुरू झाली ती शेड बाहेरून तशीच ठेवण्यात आली व तिचा जुनाट चेहरा कायम ठेवला.

**न्यू ग्रेट ईस्टर्न स्पिनिंग अँड विव्हिंग मिल्स**

वस्तुस्थिती व आकडेवारी यांची अशीच हातचलाखी इतर मिल्समध्ये ही उघडपणे दिसून येते. ग्रेट इस्टर्न स्पिनिंग अँड विव्हिंग मिलकडे 2.31 हेक्टर जमीन होती. (मालक कनोरिया यांची सुरुवातीस मुलाखत घेतली होती) दोन पुनर्वसन योजना करण्यात आल्या होत्या. पहिली योजना जी 1993 मध्ये मंजूर झाली होती त्यामध्ये 29700 स्पिंडल्स चालतील असे होते, तर त्यावेळी प्रत्यक्षातच फक्त 10000 स्पिंडल्स चालत होती असे जीकेएसए म्हणते. त्याचप्रमाणे त्यांनी मिल्सची विव्हिंग क्षमता 304 मागांची आहे असे म्हटले पण प्रत्यक्षात त्याच्याकडे 1/5 पण माग नव्हते. कंपनीने त्यांच्या पटावर 1200 कामगार दाखवले पण प्रत्यक्षात 200च होते. त्यांनी 1 लाख 20 हजार चौ. फूट एफएसआय 1200 रु. प्रति चौ.फूट इतक्या कमी दराने विकल्याचे दाखवले पण ही किंमत खूपच कमी दाखवली होती. याही बाबतीत आयडीबीआयने या योजनेची ऑपरेटिंग एजन्सी या नात्याने आपली जबाबदारी पार पाडली नाही. पहिली योजना मंजूर झाली तेव्हा एवढी जमीन खरोखरीच रिकामी आहे की नाही एवढी प्राथमिक तपासणी तरी करायला हवी होती.

ही योजना मंजूर होऊनही कंपनीने मिल परत सुरू केली नाही. जीकेएसएसने ही केस हायकोर्टात नेली तेव्हा कोर्टाने मिल चालू करण्याची आज्ञा दिली. कंपनीने गिरणी 2 वर्षे बंद ठेवल्यावर पुनः चालू केली पण फक्त 250 कामगारांना परत कामावर घेतले. गिरणी फक्त अंशतः सुरू झाली, त्यातली बरीचशी खाती बंदच होती. कंपनीने अपूरे कामगार असल्यामुळे गिरणी चालू शकत नसल्याचे सांगितले. 1995 मध्ये गिरणीस आग लागली. नेहमीचाच चमत्कार : कुलाब्याच्या मुकेश मिल्सचे चालू विभाग 1982 मध्ये आगीत पूर्ण जळून गेले होते. जेव्हा कापड गिरण्यांचा मोठा संप चालू होता तेव्हा स्पिनिंग खात्यातील सर्व भाग भस्मसात झाले, व नष्ट झाले. राज्याच्या मजूर व उद्योग मंत्र्यांबरोबर अनेक सभा झाल्या पण आदेशाची अंमलबजावणी न केल्याबद्दल कसलीही कारवाई झाली नाही उलट महाराष्ट्र सरकारच्या सचिवांनी एएआयएफआरला लिहिले की योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित चालू आहे. जानेवारी1996 मध्ये राज्य सरकारच्या नायब सचिवांनी एएआयएफआरला पुनः तेच कळवले व पुढे असेही सांगितले की सरकारने एमएमसीला अतिरिक्त एफएसआयचा विकास करण्यासाठी परवानगी लवकर द्यावी. या सर्व पार्श्वभूमीवर आणि त्यावर कुणाचीच हरकत नसल्यामुळे त्याच वर्षी मार्चमध्ये सुधारित पुनर्वसन योजना मंजूर झाली. सभेमध्ये राज्य सरकारने आधीची योजना अंमलात आणण्यात आली नसल्याबद्दल अवाक्षरही काढले नाही.

कामगारांनी या योजनेला आव्हान दिले. त्यांनी दाखवून दिले की जे क्षेत्र पहिल्या योजनेला हिरवा झेंडा दाखवला तेव्हा रिकामे दाखवले होते, ते तसे नव्हतेच. बरीचशी खाती बंद करूनच ते क्षेत्र उपलब्ध होणार होते. यात प्रोसेसिंग खातेही बंद करावे लागणार होते. त्यांनी आरोप केला की आग ही जमीन मुक्त करण्यासाठी जाणून बुजून लावण्यात आली. म्हणजे ही मुक्त जमीन विकता येईल. सरकारने आगीच्या कारणाबद्दल कसलीही चौकशी केली नाही. त्यानी हेही निदर्शनास आणून दिले की फक्त 250 कामगारांनाच कसे कामावर घेतले गेले व अनेक इतर कामगारांना त्याची थकबाकी मिळाली नाही. 500 कामगारांना त्यांच्या थकबाकीच्या निम्म्याहून कमी रक्कम मिळाली. सरकारने या हरकती उपस्थित न केल्याबद्दल त्यांनी

सरकारला दोष दिला. या हरकतीमुळे कदाचित दुसऱ्या योजनेस मंजूरी मिळणे थांबले असते, कारण त्या योजनेत स्पिंडल्स व लूम्स अजून कमी केले होते. प्रोसेसिंग हाऊस व स्पिनिंग अॅड ऑटो डिपार्टमेंट्स बंद झाल्यावर विक्रीसाठी 1 लाख 20 हजार चौ.फू. जमीन राहते. याचा अर्थ त्यांचा आधीचा दावा खोटा ठरतो. शिवाय डीसी रुल्सचे पालन झाले नव्हते. कारण 2/3 क्षेत्र एमएमजी व म्हाडा यासाठी राखून ठेवण्यात आले नव्हते. आर्थिक संस्था व राज्य सरकार यांनी योजनेवर नीट देखरेख ठेवली नव्हती. तांत्रिक व्यवहार्यता अहवाल तयार केला नव्हता किंवा विलय कमिटी नेमली नव्हती.

**मॉडर्न मिल**

मॉडर्न मिलचे क्षेत्र भायखळा येथे 5.65 हेक्टर एवढे असून ती गिरणी आठ वर्षे झाली बंद होती. 1995 मध्ये कंपनीने बीआयएफआरला नवीन पुनर्वसन योजना सादर केली. आधीच्या प्रस्तावानंतर दोन वर्षांनी महाराष्ट्र सरकारने जमीन विक्री करण्यास परवानगी दिली. एका अटीवर ती अट म्हणजे प्रवर्तकांनी 10 टक्के बिल्टअप एरिया कामगारांना घरबांधणी निष्पन्न संस्थेसाठी राखून ठेवावी. पण या प्रस्तावातून काहीच निष्पन्न झाले नाही. बीआयएफआरने सांगितले की मंजूर योजनेप्रमाणे अतिरिक्त एफएसआय व टीडीआरने विकून 28 कोटी रुपये उभे करायचे होते. त्याच्या बदल्यात कंपनीला 20 कोटी रुपये ग्रेट ईस्टर्न शिपिंग कडून व्याजमुक्त डिपॉझिट म्हणून मिळाले होते. ग्रे. इंडियन शिपिंग कंपनी तिथे घरबांधणी करणार होती. बेंचचे म्हणणे यातून कंपनीचा थकित तोटा भरून येणार नाही. म्हणून खूपच सुधारित योजना सादर करण्यास सांगण्यात आले. या निर्णयाविरुद्धचे अपील फेटाळण्यात आले व कंपनीने 1996 मध्ये तिसरी योजना पाठवली. त्यात असा अंदाज व्यक्त केला होता की कंपनीला 86 कोटींच्या घरबांधणी व्यवहारात26 कोटींचा फायदा होईल. आधीच्या 28 कोटी शिवाय हा फायदा होणार होता. यात विरोधाभास असा की तिसऱ्या पुनर्वसन योजनेचा खर्च पहिल्या योजनेपेक्षा जास्त होता.

एएआयएफआरने1996 मध्ये जाहीर केले की घरबांधणी विकाससुद्धा ते करू शकतात. आणखी विरोधाभास म्हणजे 100 विशिष्ट कौशल्य प्राप्त कामगार नवीन स्पिनिंग मशीनरीसाठी भरती करायचे होते. आधीचे 300 कामगार व स्टाफ होताच. कंपनीची अपेक्षा घरबांधणी व कापड उद्योग यातून 1997-98 मध्ये 69 लाखांचा नफा मिळावा अशी होती. हा तिसरा प्रस्ताव मान्य करण्यात आला होता. कारण सध्याचे 7617 स्पिंडल्स व नवीन 864 ओपन एंड स्पिनिंग रोटर्स व घरबांधणी व्यवसाय यांनी कंपनीचे पुनरुज्जीवन होईल. तिचा आधीच थकित तोटा अपेक्षेपेक्षा लवकर भरून निघेल.

यातून हे स्पष्ट होते की कंपनीने मोठ्या प्रमाणावर अशा क्षेत्रात पदार्पण केले आहे ज्याचा कापड उद्योगाशी सुतराम संबंध नाही. कापड उद्योगांपैकी कंपनी फक्त स्पिनिंग करते व विव्हिंग पूर्णपणे बंद केले आहे. सूत विक्रीपासून एकूण फायदा 2.9 कोटी तर घरबांधणीपासून फायदा26 कोटी जवळजवळ 9 पट फक्त 300 कामगार उरले आहेत ही गोष्टच पुरेशी बोलकी आहे. स्पिनिंग काम चालू ठेवणे हे पूर्ण वेळ घरबांधणी उद्योगात झालेले परिवर्तन लपवण्यासाठी ठेवलेले हे अंजिराचे पान (फिग लिफ) आहे. मुंबईच्या औद्योगिक केंद्रात होत असलेल्या या महत्त्वाच्या बदलाबद्दल कोणत्याही घटकाला - केंद्र सरकारपासून राज्य सरकारी संस्थांना, म्युनिसिपल अधिकाऱ्यांना याची विशेष काळजी वाटते आहे असे दिसत नाही. ही मिल सध्या 40 मजली 'बेल्वेडर कोर्ट' या इमारतीची जागा आहे. व ही आशियातील सर्वांत उंच इमारत होणार आहे.

ही उदाहरणे, पुनर्वसनाच्या तत्त्वासच कसा हरताळ फासला जात आहे हे समजण्यास पुरेशी आहेत. गिरणी संयुक्त युनिट म्हणून चालवणे शक्य नाही असे जरी मानले तरी शहराने मध्यवर्ती कामगारांच्या क्षेत्रातील त्यांचे क्षीण होत चाललेल्या नशीबाचे पुनरुत्पादन करण्याची संधी गमावली आहे हे निश्चित. राज्य सरकारने पुढे केलेल्या1/3 चे सूत्राने कामगारांना थोडीशी सुरक्षितता प्रदान केली असती कारण प्रत्येक मिलची पूर्ण

विक्री किंवा पुनर्विकास प्लांट व मशिनरीवरील ताज्या गुंतवणुकीवर आधारित होता. व त्यामुळे एखाद्या तरी भागाच्या चालू असण्यातील फायदेशीरपणा. परंतु हे धोरण अंमलबजावणीपेक्षा तोडण्यासाठीच वापरले गेले. नियमांना अनुसरून वागण्याच्या तत्वास तोंडदेखले वायदे करत प्रवर्तकांनी प्रत्येक बाबतीत मिल चालवून जास्त फायदेशीर कामामध्ये भाग घेण्याच्या सबबीमागे दडून राहण्याचे काम केले. खटाव मिल हे या अशा निर्लज्ज हातचलाखीचे उत्तम उदाहरण आहे.

या ठिकाणी आणखी एक विचार प्रसंगोचित आहे. मिलमालकांनी करोडो रुपये कर्ज म्हणून बँका व आर्थिक संस्थांकडून घेतले आहेत. या संस्थाचा पैसा हा सार्वजनिक पैसा आहे. या संस्थांनी या पैशाचा कंपन्यांकडून गैरव्यवहार होत असताना लक्ष कां दिले नाही व आपले कर्ज वसूल करण्यासाठी पावले कां उचलली नाहीत? आम्ही आधीच नमूद केल्याप्रमाणे ओंकार गोस्वामी व इतर दोघांनी केलेल्या अभ्यासावरून असे दिसते की 1981-1987 दरम्यान आजारी गिरण्याकडे अडकून पडलेले बँक क्रेडिट हे सर्व उद्योगांना दिलेल्या अँडव्हान्सेसच्या 9 टक्के एवढे होते. खटाव मिलच्या बाबतीत एसबीआयचे कर्ज बोरिवलीच्या जमिनीच्या विक्रीतून अपेक्षीत रकमेपेक्षा जास्त होते. त्यासाठी एसबीआयचा डायरेक्टर मिलच्या बोर्डावर होता. अनेक लोकांना असे वाटते की गिरणी मालकांची जमीन ही त्यांची खासगी मालमत्ता आहे. त्यामुळे त्यांचे काय करायचे त्याचा त्यांना पूर्ण अधिकार असला पाहिजे. असे जरी असले परिस्थिती पूर्णपणे बदलते, जेव्हा आपल्याला जाणवते की हे उद्योग चालवण्यासाठी कोट्यावधी रुपयांचा सार्वजनिक पैसा यात ओतलेला आहे. बऱ्याच उदाहरणांत आपल्याला असे दिसते की हे उद्योग व्यापाऱ्याना घरबांधणी करण्यासाठी अलिकडच्या काळात विकत घेतले आहेत.

### मुकेश मिल्स

आता शेवटची कहाणी आहे मुकेश मिल्सची जगातल्या इतर कोणत्याही कापड गिरणीस लाभले नसेल असे स्थान या गिरणीस लाभले आहे. अत्यंत भारी किंमतीच्या जागेचा तुकडा या मिलला लाभला आहे. मुंबईच्या अन्य मिल्सच्या तुलनेत ही मिल मुंबई बेटाच्या एका टोकावर वसली आहे. या सामुद्रधूनीच्या पूर्व किनाऱ्यावर ही मिल उभी असून ससून डॉक व मिलच्या मध्ये एक अरुंद खाडी फक्त छोट्या मच्छीमारी बोटी जाऊ शकतील अशी, आहे तिथून मुंबईचे दर्शन घडते तसेच समुद्राचा भव्य व नितान्त सुंदर देखावा दिसतो. जवळजवळ 5 हेक्टर क्षेत्रावर पसरलेल्या त्या गिरणीचा बराचसा भाग 1982च्या संपाच्या सुमारास आगीत भस्मसात झाला. हा अपघात - कामगारांच्या मते, मालक ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी गिरणी बंद करून त्या जमिनीचा विकास करण्यासाठी घडवून आणला असावा. उत्पादनाच्या कामासाठी 2 हेक्टर जमीन लागत होती. टीसीआयचे मालक आगरवाल सांगतात की त्यांनी 1975 साली ही गिरणी घेतली तेव्हापासून दरमहा 5 ते 8 लाख रुपयांचा तोटा ते सहन करत आहेत. व 1983 मध्ये संप संपल्यानंतर गिरणी पुन: सुरू करणे परवडण्यासारखे नाव्हते. एका दशकानंतर साठलेल्या तोट्याची रक्कम जवळजवळ 9.5 कोटी रुपयावर होती.

1983 मध्ये गिरणी बंद केल्याच्या विरोधात दत्ता सामंत यानी 10 हजार कामगारांचा मोर्चा नेला होता. (मुकेश व मफतलालचे एक युनिट व एक सिल्क व वुलन मिल बंद केल्याबद्दल) मालकांचा 4 हेक्टर जागेवर सुप्रसिद्ध ताजमहाल हॉटेलसारखे हॉटेल बांधण्याचा इरादा आहे असा आरोप केला जात होता. पंचतारांकित हॉटेल्स व हॉस्पिटल्सना 2.5 एफएसआय मिळतो म्हणजे सर्वसाधरण 1.33 पेक्षा दुप्पट. राज्य सरकारने मिल बंद केल्याबद्दल सीआयओ चौकशी करण्याचे आश्वासन दिले पण प्रत्यक्षात तसे काहीच घडले नाही. आगरवाल यांनी एकीकडे मिल व कामगारांची घरे पाडून तिथे हॉटेल व घरे बांधण्यासाठी अर्बन लँड सिलिंग अ‍ॅथॉरिटीचा अर्ज केला. त्याचवेळी दुसरीकडे मिलच्या आधुनिकीकरणासाठी आयडीबीआय, आयसीआयसीआय व इतर आर्थिक संस्थाकडून 1.8 कोटीचे कर्ज घेतले असे

सांगितले जाते. महाराष्ट्र सरकारने टीसीआयचा मिल बंद करण्याबद्दलचा अर्ज इंडस्ट्रियल डिस्प्यूट्स ॲक्टखाली फेटाळून लावला. 12 वर्षांच्या लांबलेल्या कोर्टबाजीनंतर कंपनी हायकोर्टाला त्यांचा निर्णय बदलण्याची विनंती करत होती. मुकेश मिल्सची केस अजूनच जास्त घोटाळ्याची झाली होती कारण तेथील 40 हजार चौ.मी. जागेपैकी 13600 चौ.मी. जागेवर कामगारांची घरे होती व ही जागा म्हणजे नुसती जागा नव्हती तर ती प्रचंड मौल्यवान जागा होती. शिवाय कामगारांच्या कुटुंबातील लोकांना जवळपास नोकऱ्या मिळाल्या होत्या. त्यामुळे ते तिथून हलायला तयार नव्हते. टीसीआयने त्यांच्या विरुद्ध कारवाई पण सुरू केली होती. काही कुटुंबे तर तिथे पाच पिढ्या रहात होती. या दरिद्री रहिवाशांना त्यांच्या सुखवस्तू कुलाबावासियांच्या दृष्टीसमोरून दूर करण्यासाठी 50 उंचीची भिंत बांधली होती. 80च्या सुरुवातीपासून मिलची चक्रे थांबली होती. मालकांनी ही घरे 'हम'सारख्या बॉलिवुडच्या व्यापारीदृष्ट्या यशस्वी चित्रपटांसाठी सेट्स म्हणून भाड्याने द्यायला सुरुवात केली. मिलच्या जळालेल्या भागांच्या पार्श्वभूमीवर समुद्राच्या काठाने पाणवनस्पतीमधून रॅम्पवॉक करताना चालावे अशा तऱ्हेने चाललेल्या एखाद्या मॉडेलचे चित्र नजरेसमोर आणायला हरकत नाही.

1996 मध्ये 'लपवलेली नदी' (हिडन रीव्हर) नावाचा एक शो, ज्यामध्ये नाट्य व नृत्यातील शास्त्रोक्त व पारंपरिक लोककला यांचे मिश्रण करून व ज्याचे नृत्यदिग्दर्शन राजीव सेठ नावाच्या दिल्लीच्या डिझायनरने केले होते, तो शो तिथे चालू होता तेव्हाच संतापलेल्या कामगारांनी त्याला घेराव घातला. त्यांनी अत्यंत कडवट टीका करत सांगितले की मिल बंद झाल्यापासून त्यांना वाके नाहीत आणि आमच्या जागा भाड्याने देऊन व्यवस्थापन पैसे कमवित आहे, त्यांचे जीवनमान दिवसेंदिवस हळूहळू वाईट होत आहे. सेठीनी जाहीर केले की मला कामगाराबद्दल पूर्ण सहानुभूती आहे. ज्या लोकांनी आपले अवघे जीवन या शहराला व त्याच्या अर्थव्यवस्थेलाच अर्पण केले. त्यांना आपण डावलू शकत नाही. या वेळेवर केलेल्या वक्तव्याचा कामगारांनी तिथे हजर असलेल्या शहरातल्या उच्चभ्रू वजनदार प्रेक्षकांसमोर चांगला फायदा करून घेतला. श्री. सेठी यांनी कामगारांना दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमास येण्याचे निमंत्रण दिले व त्यांच्यापैकी बरेच दुसऱ्या दिवशी आले व ते त्यात सहभागी झाले. एका नाट्यसमीक्षकाने म्हटले'' हा प्रसंग प्रभावीपणे हे दाखवून देतो की परदेशी गुंतवणुकदारांचे चांगूलपण अर्थव्यवस्था भलेही करो पण गेटबाहेरच्या कामगारांना विसरून चालणार नाही.

फेब्रुवारी 1998 मध्ये मुकेश मिलमध्ये आणखी एक आग लागली व जिथे पूर्वी स्पिनिंग व ब्लोरूम खाती होती त्याचे तिन्ही मजले आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. गॅस सिलिंडरच्या स्फोटामुळे आग लागली. त्यामुळे संबंध कुलाब्यामध्ये घबराहट पसरली. लोकशाही हक्क संघटना ज्यांनी मिल्सचा खून लिहिले त्यांनी आरोप केला की कामगार व त्यांच्या कुटुंबांना घरातून बाहेर काढण्यासाठी केलेली ही जाळपोळ आहे. व्हील - रेन्ट ए कार या टीसीआयच्या मालकीच्या कंपनीच्या सर्व गाड्या आदल्या दिवशीच बाहेर काढल्या होत्या व आगीच्या रात्री कसलेही फिल्मचे शूटिंग ठेवलेले नव्हते याकडे त्यांनी लक्ष वेधले या सर्वांवर मार्च 1999 मध्ये पडदा पडला जेव्हा ठरलेले 177 कामगार व व्यवस्थापनाने कोर्टाबाहेर तडतोड केली ज्यामुळे प्रत्येक कामगारांला 6.5 लक्ष रुपये मिळतील व ते कामगार राहणार नाहीत. त्याचबरोबर ते चाळीतील जागा सोडतील. व्यवस्थापनाने सुरुवातीस 5.5 लक्ष द्याचे ठरवले होते पण अतिरिक्त चीफ मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट के. एच. होळांबे पाटील यांच्या मध्यस्थीनंतर ही रक्कम वाढवण्यात आली. ही तडजोड महत्त्वाची होती याचे कारण मिलमध्ये आतापर्यंत दिल्या गेलेल्या रकमेपेक्षा ही रक्कम जास्त होती. एवढेच नव्हे तर (ही रक्कम घरबांधणीची त्यावेळची किंमत दर्शवते) पण योग्य तडजोड म्हणता येईल अशी ही तडजोड होती. टीसीआयला तिथे हॉटेल बांधायचे आहे अशी अफवा होती. तशीच ती एनटीसी च्या इंडिया युनायटेड मिल नं. 6 (इंदू

डाय वर्क्स) लाही लागू ठरते. ही मिल समुद्राला लागून कॅडेल रोडवर आहे. त्यांनाही या जागेचा हॉटेल किंवा हॉस्पिटलसाठी उपयोग करायचा होता.

राजकीय कार्यकर्ते संजीव चिंबुलकर यांच्यामते खासगी गिरण्यांनी व्यापलेली एकूण जमीन जवळजवळ 28 लक्ष चौ.मी. आहे. ती जर राहत्या घरांसाठी वापरली तर त्यातून 14900 कोटी रु. उभे राहतील. त्यांनी हा आकडा वेगवेगळ्या मिल्सनी उद्योगातून सूट मिळवण्यासाठी अर्बन लँड सिलिंग ॲथॉरिटीकडे केलेल्या अर्जावरून काढला आहे. किंवा राज्य सरकारने विकासासाठी परवानगी दिलेली जमीन यावरून या रक्कमेची कामगारांना देय रक्कमेशी (अंदाजे 600 कोटी) तुलना केली पाहिजे. देय रक्कम 60 हजार कामगारांना प्रत्येकी 1 लाख रुपये दिल्यास 600 कोटी रुपये होते. त्यांनी पुढे सांगितले की ही अतिरिक्त जमीन युएलसी ॲक्टप्रमाणे राज्य सरकारकडे द्यावयास पाहिजे, पण दिलेली नाही. ती सरकारकडे दिल्यास त्यातून गिरणी कामगारांसाठी नवीन नोकऱ्या तयार होऊ शकतील. त्यांनी असाही आरोप केला की आरएमएमएस कामगारांना मिळणाऱ्या नुकसान भरपाईचा 5 टक्के वाटा घेते. त्यामुळे आरएमएमएसला मिल बंद करण्यासाठी मिल मालकांबरोबर तडजोड करण्यास प्रोत्साहन मिळते. मिल मालक व सरकार यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर याबाबतीत संगमनत आहे असा त्याचा म्हणण्याचा अर्थ होतो, थोडे जास्त तापून हा अर्थ काढला आहे असे वाटते.

**टीपा :**

1) डेडली डिल्स : बिझीनेस वर्ल्ड 1994
2) ब्लडी रिकोचेट्स : हरीश नंबियार, इंडियन एक्सप्रेस मे 15, 1994
3) तत्रैव : द ओव्हरलॉर्डस, द वीक मे 22, 1994
4) दाऊदच्या कंपनीने खटाव मिलची जमीन 400 कोटीला घेतली - दत्ता सामंत म्हणतात. इंडियन एक्सप्रेस मे 23, 1994
5) अमर-अरुण-इब्राहिम, अमरजित सिंह, सामरा मुलाकत हिंदुस्थान टाइम्स मे 16, 1994
6) द रेन ऑफ द डॉन्स : हरिष नंबियार - इंडियन एक्सप्रेस 13 नोव्हेंबर, 1994
7) आश्विन नाईकला भारत बांगला देश सरहद्द ओलांडताना अटक, टोल ऑगस्ट 6, 1999 - 'अश्विन नाईक द मेन बिहाइंड मर्डर अँड मॅड्रेक्स'
8) आश्विन नाईक मुंबईत का आहे? रविवार मीड-डे ऑगस्ट 22,
9) द वीक - ऑप सिट
10) द खटाव किलिंग - रविवार मे 22, 1994
11) द वीक - ऑप सिट
12) टेक्सटाइल वर्कर्स लॅग्विश - टोल ऑक्टोबर 7, 1991
13) पक्ष कामगारांची मनधरणी करतात - द इंडिपेडंट ऑक्टोबर 12, 1999
14) डिव्हायडेड बाय गन्स अँड मनी - बीएस 28, 1994
15) द वीक - ऑप सिट
16) गीव्ह अस द मिल - मिड-डे, सप्टेंबर 14, 1997
17) टोल, मे 10, 1994
18) सिटी मिल्स डीसी रुल्सचे उल्लंघन करतात, संयज जोग, ऑगस्ट 11, 1997
19) खटाव जमीन मोकळी करा वा कायदेशीर लढ्यास तयार रहा - बीआयएफआर सरकारला उद्देशून - ईटी फेब्रुवारी 16, 1997
20) खटाव मिल जमीन विक्री - एक अपवाद : रवि भिडे, एप्रिल 13, 1997
21) खटाव जमीन विक्रीस सरकारची मान्यता : मार्च 17,. 1997
22) खटावचे मालक जमीन विक्रीची पुन: बोलणी सुरू : अमृता नायर-घासवाळी, टोल सप्टेंबर 5, 1997
23) आम्हाला गिरणी द्या - ऑप सिटी
24) 6000 खटाव मिल कामगार गिरणी पुन: सुरू करणार, एए डिसेंबर 27, 1997

25) बीआयएफआर खटाव व्यवस्थापनास पुनर्वसन योजना करायला सांगते : नोव्हेंबर 25, 1997

26) आयसीआयसीआय खटाव माकनजी मिलसाठी नवीन पुनर्वसन योजना बनवणार : संजय जोग, जुलै 16, 1998. खटाव मिलची 175 कोटीची पुनर्वसन योजना सरकारने फेटाळली : संजय जोग - जुलै 30, 1998

27) बीआयएफआर खटाव मिल्ससाठी दार उघडा आहे. ऑगस्ट 13, 1999

28) आयई - जानेवारी 17, 1997

29) टोल - जानेवारी 18, 1997

30) दत्ता सामंत - श्रद्धांजली दीपंकर भट्टाचार्य, ईपीडब्ल्यू जानेवारी 25, 1997

31) सिंग गुरबीर - हू डन इट, ईटी जानेवारी 17, 1997

32) मराठी माणसानी सेना बनवली पण बसली पोटावर लाथ : दत्ता सामंत मुलाखत, बॉम्बे टाइम्स जानेवारी 17, 1997

33) सामंत खून प्रकरणी तिघांना शिक्षा - आयई जुलै 25, 2000

34) तत्रैव

35) मुंबई प्रादेशिक विकास योजना टीकेच्या भोवऱ्यात - टोल जानेवारी, 1997

36) सदा पावलेचे नवीन भरती केलेले ठक्कर यांचे खूनी - बीटी एप्रिल, 24, 1997

37) तक्रार करणाऱ्या उद्योजकांवर ठाकरे बरसले - बीटी मे, 1997

38) किलिंग ट्रेड मिल्स - आऊटलुक एप्रिल 30, 1997

39) सनरेड लँड डिल मे बी मोटिव्ह - एए एप्रिल 18, 1998

40) वाळकेश्वर जंक्शनवर बिल्डरचा खून - आयई फेब्रुवारी 6, 1998

41) कामगार रघुवंशी टेक्सटाईल मिलचा ताबा घेतात - आटी सप्टेंबर 17, 1999

42) मिल्स जेव्हा बंद होतात तेव्हा माफिया भरती होतात - आयई नोव्हेंबर 28, 1998

43) ट्रेड युनियन्सचा प्रभाव कमी होत आहे - बीआय नोव्हेंबर 4-17, 1996

44) तत्रैव

45) पटेल सुजाता व थॉर्नर ॲलिस - (1995) बॉम्बे मेटाफोर फॉर मॉडर्न इंडिया अँड बॉम्बे : मोझाइक ऑफ मॉडर्न कल्चर, ओयूपी बॉम्बे

46) फेब्रुवारी 7, 1998

47) स्वेच्छानिवृत्ती घेऊन श्रीराम मिल्समधून बाहेर पडलेले कामगार - यावरून उठलेले वादळ - गुरबीर सिंग : ईटी सप्टेंबर 2, 1996

48) श्रीराम मिल्स जमीनीचा विकास मतभेद अून पारित : संजय जोग - एफई मार्च 13, 1998

49) स्टंट ॲट मुकेश मिल्स - लोकल्स इन ए फाइट सिन्स - गुरबीर सिंग ईटी ऑक्टोबर 20, 1995

50) दत्ता सामंत क्रेडिट सोसायटीच्या निवडणुकीत आघाडीवर - एफपीयु डिसेंबर 7, 1993

51) डिस्पेलस वर्क्स ऑफ मुकेश मिल्स अपसेट ओव्हर शो डेल्ड इन मिल कम्पाऊंड - टोल एप्रिल 1, 1996

52) चालू नसलेल्या गिरणीच्या 147 कामगारांनी जमीन सोडण्यास संमती दिली. - टोल एप्रिल 1, 1999

**अनुवादक : एस. एन. निबंधे**

■ ■ ■ ■ ■


McDonald's


इंडिया युनायटेड मिल नं३
INDIA UNITED MILLS No3